नोव्हेंबर / November
शुक्रवार / Friday
दि.०६ / Dt: 06
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक १८/Issue 18 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीड नगरपरिषदेत रमाई घरकुल नव्हे, लाचखोरांचा अड्डा!

झाडू मारायला माणसं नाहीत, मग घरकुल विभागात ४ पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची फौज कशासाठी?

घरकुलच्या नावाखाली कष्टकऱ्यांचे खिसे कापणारा तो बकासुर कोण?

घाम गाळणाऱ्यांना ताटकळत ठेवले, मलिदा देणाऱ्यांना घरबसल्या हफ्ते!



मुख्याधिकारी या हॉटेलबाजांना रस्त्यावर उतरवणार का?

एका बाजूला कर्मचारी नसल्याचे सांगून संपूर्ण शहर घाणीच्या साम्राज्यात लोटायचे आणि दुसऱ्या बाजूला मलिदा मिळणाऱ्या टेबलवर सफाई कर्मचाऱ्यांना बसवून त्यांना हॉटेलात टाईमपास करण्याची मोकळीक द्यायची, हा बीड पालिकेचा अजब कारभार आता चव्हाट्यावर आला आहे. मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन रमाई घरकुल विभागातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांना तत्काळ तिथून हटवून त्यांच्या मूळ स्वच्छता विभागात पाठवावे, जेणेकरून शहराची स्वच्छता तरी नीट होईल, अशी मागणी जोर धरत आहे. आता मुख्याधिकारी या हॉटेलबाज टोळीवर कारवाई करून त्यांना रस्त्यावर झाडू मारायला लावणार की त्यांचे हे लाड असेच पुरवले जाणार, याकडे संपूर्ण बीडकरांचे लक्ष लागले आहे.



पालिकेच्या टेबलवर दांडी, हॉटेलात मात्र ठिय्या; घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांची अजब ऐट!

रमाई घरकुल विभागात गरजेपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची गर्दी झाल्याने या कर्मचाऱ्यांना पालिकेत साधे बसण्याचेही काम उरलेले नाही. परिणामी, हे कर्मचारी नगरपरिषदेच्या कार्यालयात कमी आणि शहरातील हॉटेलांमध्येच चहा-पाण्याच्या नावाखाली तासन् तास गप्पा मारताना जास्त आढळतात, अशी जोरदार चर्चा पालिकेच्या वर्तुळात रंगली आहे. गोरगरीब ऊसतोड कामगार, मजूर आपल्या घराच्या हफ्त्यासाठी कार्यालयात चकरा मारत ताटकळत उभे असतात; पण त्यांना टेबलवर साहेब नाहीत असे सांगून वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात. प्रत्यक्षात मात्र हे कर्मचारी हॉटेलात बसून टक्केवारी आणि अर्थपूर्ण व्यवहारांचे गणित मांडण्यात व्यस्त असल्याची चर्चा आता चव्हाट्यावर आली आहे.

वाघमारे साहेब, त्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा!

जोपर्यंत घरकुल विभागात ठाण मांडून बसलेल्या या कर्मचाऱ्यांची हकालपट्टी होत नाही, तोपर्यंत गरिबांची ही दिवसाढवळ्या चाललेली लूट थांबणार नाही, अशी उद्विग्न प्रतिक्रिया बीडमधील सुजाण नागरिकांमधून व्यक्त होत आहे. कर्तव्यदक्ष संभाजी वाघमारे,(सहायक आयुक्त) नगर प्रशासन बीड, यांनी तात्काळ या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा या भ्रष्टाचाराविरोधात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा आता रमाई घरकुल योजनेतील संतप्त लाभार्थ्यांनी दिला आहे.



श्रीमंतांना विनाबांधकाम तिन्ही हफ्ते; मजुरांना मात्र पालिकेच्या पायऱ्या!

मुख्याधिकारी स्थळ पाहणी करणार का; स्थळ पाहणीत फुटणार बिंग?

बीड/जगमित्र न्यूज

स्वतःचे हक्काचे पक्के घर असावे, या स्वप्नासाठी काबाडकष्ट करणाऱ्या गोरगरिबांच्या पाठीवर रमाई घरकुल योजनेच्या माध्यमातून आणखी एक मोठा आघात होत (पान ५ वर)

दिवाळी सणानिमित्त परळीत नियमित पाणी पुरवठा; दहा दिवसांच्या प्रतीक्षेतून नागरिकांना दिलासा!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

''दिवाळी हा आनंदाचा सण असून, या काळात परळीकरांना पाण्यासाठी अडचण येऊ नये, यासाठी दिवाळीपर्यंत शहरात नियमित पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले आहे. दहा दिवसांआड होणाऱ्या पाणीपुरवठ्यात बदल करून नागरिकांना दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पाणीपुरवठ्यात कोणतीही अडचण निर्माण झाल्यास ती तातडीने सोडविण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत. दुष्काळी परिस्थितीमुळे पाणीसाठा मर्यादित असल्याने नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा. परळीकरांची दिवाळी पाण्याअभावी अडचणीत येऊ नये, यासाठी नगर परिषद प्रशासन कटिबद्ध आहेत अशी माहिती सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी दिली.

दिवाळीपर्यंत पाणीपुरवठा नियमित ठेवण्याचा निर्णय; सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांच्या पाणी पुरवठा विभागाला सूचना

परळीकरांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी नियमित पाणीपुरवठ्याचे नियोजन सभापती सौ.जयश्रीताई गित्ते



दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर परळी शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी नगर परिषदेकडून विशेष नियोजन करण्यात आले असून, दहा दिवसांआड सुरू असलेला पाणीपुरवठा दिवाळी सणानिमित्त शनिवार ते बुधवार या दिवशी नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिवाळीपर्यंत शहरात सुरळीत आणि नियमित पाणीपुरवठा सुरू राहील, अशी ग्वाही पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी दिली आहे. दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण असल्याने नागरिकांना पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी सभापती जयश्रीताई गित्ते यांनी नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. शहरातील ज्या भागात कमी दाबाने किंवा अनियमित पाणीपुरवठा होत आहे, तेथील तक्रारी तातडीने सोडविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ज्या भागात पाणीपुरवठा होणार नाही, अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची तयारीही नगर परिषद (पान ५ वर)







महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

मुखेडमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तराचे स्वतंत्र न्यायालय स्थापन होणार

मुखेड । प्रतिनिधी

मुखेड येथील कार्यरत जोड न्यायालयाऐवजी (लिंक कोर्ट) आता दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तराचे स्वतंत्र आणि नियमित न्यायालय स्थापन करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, न्यायालयाला पदनिर्मितीसह मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे मुखेड तालुक्यातील नागरिकांना स्थानिक पातळीवरच न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यापूर्वी दिवाणी स्वरूपाच्या दाव्यांसाठी नागरिकांना जिल्हा न्यायालयात जावे लागत होते. यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च होत होते. अनेकदा खटल्यांच्या सुनावणीसाठी वारंवार ये-जा करावी लागत असल्याने पक्षकारांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत होता. मात्र, आता मुखेड येथेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तराचे स्वतंत्र न्यायालय सुरू होणार असल्याने नागरिकांची ही गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच तालुक्यातील प्रलंबित खटले जलदगतीने निकाली निघतील, असा विश्वास आमदार डॉ. तुषार राठोड यांनी व्यक्त केला.

मतदारसंघातील नागरिकांना जलद आणि सुलभ न्याय मिळावा, त्यांचा वेळ व पैसा वाचावा, यासाठी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी स्वतंत्र न्यायालयाच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून, न्यायालयाच्या मंजुरीमुळे मुखेडच्या न्यायव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.

अन्न औषध प्रशासनाच्या आशीर्वादाने नांदेडमध्ये बनावट खव्याचा काळाबाजार

जिल्हाधिकाऱ्यांकडे छावा मराठा युवा महासंघाची कारवाईची मागणी; बाहेर जिल्ह्यातून भेसळयुक्त खवा आणून विकणाऱ्या व्यापाऱ्याची दुकान सील करण्याची मागणी

नांदेड । प्रतिनिधी

दिवाळी सण तोंडावर असताना नांदेड जिल्ह्यात शेकडो क्विंटल बनावट, भेसळयुक्त खवा बाहेर जिल्ह्यातून आणून विकला जात असून याला अन्न व औषध प्रशासन विभागाचा आशीर्वाद असल्याचा गंभीर आरोप छावा मराठा युवा महासंघाने केला आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करून दुकाने सील करावीत अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

जिल्हाप्रमुख प्रदीप पाटील हुंबाड आणि उपजिल्हाप्रमुख विक्रम पाटील बामणीकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिवाळीत मिठाईसाठी खव्याची मागणी मोठी असते. याचाच फायदा घेऊन नांदेड शहरातील खवा विक्री करणारे व्यापारी बाहेर जिल्ह्यातून पावडर, डालडा, युरिया आणि घातक केमिकल मिसळून तयार केलेला बनावट खवा मागवत आहेत. हा खवा खाल्ल्याने नागरिकांना फूड पॉयझनिंग पोटाचे विकार आणि गंभीर आजारांचा धोका निर्माण होत असतो. त्यामुळे बाजारात चांगल्या खव्याचा दर ४०० ते ५०० रुपये किलो असताना बनावट हवा विकणारे हे व्यापारी २५० ते ३०० रुपये किलोने बनावट खवा विकून नागरिकांच्या जीवाशी खेळत आहेत. यामुळे प्रामाणिक व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. त्यासाठी छावा मराठा युवा महासंघाने तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. (१) नांदेड जिल्ह्यातील सर्व खवा विक्रेते आणि मिठाई दुकानदारांवर तात्काळ धाडी टाकून नमुने तपासावेत, (२) भेसळयुक्त खवा सापडलेल्या दुकानांना तात्काळ सील ठोकून त्यांचा परवाना निलंबित करावा, (३) दिवाळीपर्यंत विशेष भरारी पथक नेमावे, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी छावा मराठा युवा महासंघाच्या वतीने इशारा दिला की, जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई न झाल्यास छावा मराठा युवा महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे. व या निवेदनाच्या प्रत पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड आणि पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वजीराबाद यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. दिलेल्या निवेदनावर प्रदीप पाटील हुंबाड जिल्हाप्रमुख नांदेड विक्रम पाटील बामणीकर उपजिल्हाप्रमुख नांदेड व्यंकटराव पाटील कौशल्य तालुका प्रमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



विना नंबरच्या हायवेतून गौण खनिजाची सुसाट वाहतूक; पोलीस व परिवहन विभागाचे दुर्लक्ष

नांदेड । प्रतिनिधी

शहर व जिल्ह्यामध्ये विना नंबरच्या हायवा गाड्यातून गौण खनिजाची सुसाट वाहतूक होत असून सामान्य नागरिकांना दंडाची कारवाई करणाऱ्या पोलीस व परिवहन विभागाचे मात्र दुर्लक्ष होत आहे. या विना नंबरच्या सुसाट वेगात धावणाऱ्या गाड्यामुळे अनेकांना प्राण गमवावा लागला आहे तरी यांच्यावर अंकुश ठेवला जात नसल्याने नागरिकातून संताप व्यक्त केला जात आहे.



नांदेड शहर व ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात रेती माती गिट्टी मुरूम याचे अवैध उत्खनन करून भरधाव गतीने विना नंबरच्या हायवा गाड्यांचा सर्वत्र मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक केली जात आहे. शहरात व ग्रामीण भागामध्ये अशा भरदार धावणाऱ्या गाड्यांचा अपघातातून अनेकांना प्राण गमावले लागले आहेत. पोलीस व परिवहन विभाग नित्यानेच दुचाकी व चार चाकी वाहन चालकांना अडवून दंडात्मक कारवाई करीत असते. परंतु या बेकायदा विना नंबर वाहतूक करणाऱ्या हवा टिप्पर ट्रॅक्टर यांच्याकडे मात्र जाणीवपूर्वक कानाडोळा केला जात असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक व पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाकडून गुटका मटका व जुगार अड्ड्यांवर मोठ्या कारवायांचा धडाका लावला आहे. प्रशासनाने अवैध उत्खनन करून सुसाट वेगाने धावणाऱ्या हायवा गाड्यांवर का लावत नाहीत याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहेत.

मुदखेडच्या रेल्वे प्रवाशांची सहा एक्स्प्रेसच्या थांब्यांसाठी प्रतीक्षा! थांब्यांसाठी रेल्वे प्रशासनाला साकडे

प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वरील बंद तिकीट खिडकी, अंधार आणि रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्नही उपस्थित; रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य ईश्वर पिनलवार यांचे निवेदन

मुदखेड । अतिक अहमद

मुदखेड रेल्वे जंक्शनला महत्त्वाच्या सहा एक्स्प्रेस गाड्यांचे थांबे देण्यासह प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वरील प्रलंबित प्रवासी सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य ईश्वर विठ्ठलराव पिन्नलवार यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कांबळे यांची भेट घेत निवेदन सुपूर्द केले आहे. निवेदनात पूर्णा-पटना (१७६१०), कोल्हापूर-धनबाद (११०१५), हैदराबाद-जयपूर (१७०२०), काकीनाडा-भगत की कोठी (१७६०५), चेन्नई-साईनगर शिर्डी (२२६०१) आणि अकोला-तिरुपती (१७४३०) या सहा एक्स्प्रेस गाड्यांना मुदखेड येथे थांबा देण्याची मागणी करण्यात आली आहे.



मुदखेड हे नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असून, परिसरातील ग्रामीण नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व नोकरदारांसाठी हे प्रमुख प्रवास केंद्र आहे. तसेच गाड्यांना थांबा मिळाल्यास हजारो प्रवाशांची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे.

याशिवाय प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वरील बंद तिकीट खिडकी पुन्हा सुरू करणे, साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रेल्वे गेटसमोरील सुमारे ५०० मीटर रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे आणि बुकिंग खिडकीसमोरील बंद स्ट्रीटलाईट सुरू करून कायमस्वरूपी प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या गैरसोयीची गांभीर्याने दखल घेऊन या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा ईश्वर पिन्नलवार यांनी व्यक्त केली आहे. आता रेल्वे प्रशासन या निवेदनावर काय भूमिका घेते, याकडे मुदखेडकरांचे लक्ष लागले आहे.

नांदेडच्या शिरपेचात मानाचा तुरा; डॉ. गंगाधर सोंडारे अमेरिकेची मानद डिलीट पदवी प्रदान

नांदेड । प्रतिनिधी



नांदेड जिल्ह्याच्या शिरपेच्या मध्ये एक मानाचा तुरा रोवला गेला असून जिल्ह्यातील बिलोली तालुक्याचे रहिवासी व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्ह्यातील दिग्गज नेते गंगाधर सकवाडी सोंडारे यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सर्वांनी विकासासाठी केलेल्या कामाबद्दल युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकाचा ल्युसीनिया रिसर्च विद्यापीठाची मानद पदवी देऊन गौरव करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील भूमिपुत्र असलेले गंगाधर सटवाजी सोंडारे यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याची यांची दखल घेऊन प्रतिष्ठित मानला जाणारा डॉक्टर म्हणजेच मानस पदवी प्रदान करून गौरव करण्यात आला आहे. नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष असलेले गंगाधर सटवाजीराव सोंडारे बोरगावकर हे मागील ३५ वर्षापासून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये सातत्याने कार्यरत आहेत त्यांनी अनेक गरजू व वंचितांच्या शैक्षणिक व सामाजिक अडीअडचणी मध्ये सातत्याने सहकार्य करून त्यांना उन्नतीच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत याची दखल घेऊन युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेचे लुसिन या रिसर्च विद्यापीठाने त्यांचा गौरव करून पुणे येथे त्यांना डिलीट पदवी प्रदान केली आहे. गंगाधर सोंडारे यांना डिलीट पदवी प्रदान झाल्याबद्दल नांदेडचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्यासह जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

आयडॉल शिक्षक शेख साजिद व स्वपनील यरसनवार यांचा मित्र परिवारातर्फे सत्कार


कुंडलवाडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद् पुणे यांच्यातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल कुंडलवाडीतील दोन शिक्षकांचा मित्र परिवारातर्फे सन्मान करण्यात आला.



हुनगुंदा उपकेंद्रातील हरनाळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा कुंडलवाडी शहरातील रहिवासी शेख साजिद युसुफमिया आणि गंजगाव प्राथमिक शाळेचे सहशिक्षक स्वपनील यरसनवार यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल दोघांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अर्जापूर जिल्हा परिषद् प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक शेख सलीम सर, गंजगाव प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक जलालखान पठाण सर, पत्रकार मोहम्मद अफजल सर, मोहम्मद सर, शहरातील प्रतिष्ठित व्यापारी गणेश उत्तरवार, अशोक पडकुटलावार, शेख माजिद आदी उपस्थित होते. या निवडीबद्दल दोन्ही शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मध्यरात्री किराणा दुकानात चोरीचा प्रयत्न, माल मात्र सुरक्षित



कुंडलवाडी । प्रतिनिधी

शहरातील मुख्य बाजारातील प्रसिद्ध व्यापारी बाबासेठ यांच्या बाबा किराणा दुकानात बुधवार (दि. ४ नोव्हेंबर) मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. चोरट्यांनी चोरीच्या उद्देशाने दुकानावरील कौलारू खापरे काढून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचा डाव फसला. सकाळी दुकान उघडल्यानंतर खापरे काढलेली दिसून आल्याने ही बाब उघडकीस आली.

दुकान मालक बाबा सेठ यांनी दुकानातील मालाची पाहणी केली असता कोणताही माल चोरीला गेला नसल्याचे स्पष्ट झाले. गल्ल्यातील दीड ते दोन हजार रुपयांची चिल्लर ही सुरक्षित असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. घटनेची माहिती मिळताच कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय गिरी यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व माहिती घेतली. मुख्य बाजारात त्याच रात्री आणखी २ ते ३ दुकानातही चोरीचा प्रयत्न झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून होत आहे.

देगलूर युवासेना तालुकाप्रमुखपदी भागवत पाटील सोमुरकर यांची निवड

देगलूर । अजीम अन्सारी



हिंदुहृदयसम्राट वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्षप्रमुख, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर तालुका युवासेना प्रमुखपदी भागवत पाटील सोमुरकर यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती युवासेनाप्रमुख, माजी मंत्री आदित्य ठाकरे तसेच युवासेना सचिव आमदार वरुण सरदेसाई यांच्या मान्यतेने जाहीर करण्यात आली. आपल्या या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत भागवत पाटील सोमुरकर यांनी शिवसेना आणि युवासेनेच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आणि जाहीर आभार मानले आहेत.

या निवडीबाबत बोलताना सोमुरकर म्हणाले की, माझ्या आजवरच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रामाणिक कार्याची ही पावती आहे. शिवसेनाप्रमुखांच्या '८०% समाजकारण आणि २०% राजकारण' या विचारांवर निष्ठा ठेवून, माझ्या या पदाचा पूर्ण उपयोग सर्वसामान्यांच्या सेवेसाठी आणि सामाजिक कार्यासाठी करेन. येणाऱ्या काळात देगलूर तालुक्यात शिवसेना आणि युवासेना अधिक मजबूत करण्यासाठी १००% योगदान देईन या निवडीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, युवासेना विभागीय सचिव महेश खेडकर, युवासेना सहसचिव अक्षय वड्डमवार तसेच शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. भागवत पाटील सोमुरकर यांची देगलूर युवासेना तालुकाप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल तालुक्यातील पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

मनमानी कारभार भोवला! नायगाव पंचायत समितीतील डेटा एन्ट्री ऑपरेटर पांडे यांची उचलबांगडी

नायगाव । प्रतिनिधी

घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची अडवणूक, कामकाजातील अनियमितता, वरिष्ठांच्या सूचनांकडे दुर्लक्ष आणि अभियंत्यांच्या अधिकृत लॉगिनचा वापर करण्याऐवजी स्वतःच्या लॉगिनवरून घरकुलांचे फोटो अपलोड केल्याचा गंभीर प्रकार समोर आल्याने नायगाव पंचायत समिती प्रशासनाने अखेर कठोर पाऊल उचलले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत गटविकास अधिकारी (वर्ग-१) पी. एन. वानखडे यांनी मंगळवारी (दि.३) पंचायत समितीतील डेटा एन्ट्री ऑपरेटर एस. एम. पांडे यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश दिले. या कारवाईमुळे पंचायत समितीच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

पंचायत समिती नायगावच्या कार्यालयाकडून या डेटा एन्ट्री ऑपरेटरला अधिकृत पत्र देण्यात आले असून, त्यामध्ये कार्यमुक्त करण्यामागील कारणांचाही सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. या पत्रात लाभार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयासह वरिष्ठ कार्यालयांकडे वारंवार तक्रारी केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच कामकाजात नेहमीच गैरमार्गाचा अवलंब होत असल्याचे आणि लाभार्थ्यांची जाणीवपूर्वक अडवणूक केली जात असल्याचे तक्रारींतून निदर्शनास आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या कर्मचाऱ्याला वारंवार तोंडी व लेखी सूचना देऊनही कामकाजात कोणतीही सुधारणा झाली नाही. कार्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहणे, नेमून दिलेली कामे विहित वेळेत पूर्ण न करणे आणि त्यामुळे तालुक्यातील घरकुल योजनांच्या कामकाजावर परिणाम होणे, या बाबींचीही गंभीर दखल घेण्यात आली आहे.

कावळगाव येथे सुमनबाई सुर्यवंशी यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त वृक्षारोपण, मोफत आरोग्य शिबीर आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

देगलूर । अजीम अन्सारी

औरंगाबाद उच्च न्यायालयाचे अँड.अविनाश सुर्यवंशी यांच्या मातोश्री स्मृतिशेष सुमनबाई नारायण सुर्यवंशी यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त दि.३० ऑक्टोबर शुक्रवार रोजी मौ. कावळगाव येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सकाळी १० वाजता विश्वशांती बुद्ध विहार, कावळगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रमाने उपक्रमाची सुरुवात झाली. राष्ट्रवादीचे नेते लक्ष्मीकांत पदमवार, डॉ.उत्तम इंगोले, प्रकाश अमृतवार, नंदकुमार शाखावार, कैलास येसगे, जयपाल सांगवीकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर ११ वाजता मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. देगलूरचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश गवाले व डॉ.उत्तम इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र मरखेल अंतर्गत डॉ.समीर अक्यमवार, डॉ.कविता मोरे, डॉ.परशुराम क्षेत्री यांनी शेकडो रुग्णांची विविध आजारांवर तपासणी करून मोफत औषधे वाटप केले.



यावेळी आरोग्य विभागाचे उमाकांत मंकावार, मनोज सोनकांबळे, प्रशांत गायकवाड, सचिन जोंधळे, एस.सी. कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. दुपारी १ वाजता शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. गुंडप्पा खेंगटे मेमोरियल हायस्कूल, महात्मा गांधी प्राथमिक शाळा कावळगाव व जिल्हा परिषद् प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना नारायण सुर्यवंशी व केंद्र प्रमुख बी.व्ही. सुर्यवंशी यांच्या वतीने भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात आली व सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हे वाटप माजी पंचायत समिती सदस्य रमेश शिवणीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती यादव फिंरगे, उपसभापती रवी पाटील, पीआरपीचे तालुकाध्यक्ष सतीश पांडवे, मिलिंद बिरकंगन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संत गाडगेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार, बालाजी रोयलावार, काँग्रेस नेते रामदास पा.सुमठानकर, माजी पं.स.सदस्य विष्णू पाटील, नगरसेवक सुमंत कांबळे, सुनील यशमवार, शत्रुघ्न वाघमारे, नितेश पाटील, साई गंदपवार, गजू कांबळे, मा.सरपंच बाळासाहेब देशमुख, वैजनाथ येरमुणे, डॉ.पूजा गायकवाड, डॉ.भीमराव माळगे, भारतीय बौद्ध महासभेचे संजय कांबळे, प्रा. भीमराव दिपके, सुभाष कदम, मुख्याध्यापक यादव बत्तुलवार, बाबूराव जाधव, एच.बी. मानकरे, बी.बी. टिपराळे, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आईच्या स्मृतीस केवळ अश्रू नव्हे तर समाजाचे ऋण फेडणारे कार्य हीच खरी श्रद्धांजली ठरावी, या भावनेतून अँड. अविनाश नारायण सुर्यवंशी यांनी हा उपक्रम राबविला. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संग्राम सोनकांबळे कावळगावकर, संजय सोनकांबळे, निशिकांत कांबळे, श्रीनिवास मदळे, यादव सोनकांबळे, मोगलाजी सोनकांबळे, कैलास वाघमारे यांनी अथक परिश्रम घेतले. एक आई जाते तेव्हा घरातली मायेची सावली जाते, पण तिच्या नावाने लावलेले झाड, वाटलेले औषध आणि मुलांच्या हातात दिलेले शालेय साहित्य ही श्रद्धांजली चिरंतन राहते, अशी भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

जाहीर प्रगटन

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२४४/२०२६ अब्दुल शब्बीर पि. अब्दुल बशिर शेख वि. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकर, जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिमियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

अर्जदार :- अब्दुल शब्बीर पि. अब्दुल बशीर शेख, वय ४७ वर्षे, धंदा- चालक, रा. भोकरता. भोकर, जि. नांदेड विरुध्द-

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी (जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी), नगर परिषद कार्यालय, भोकर, ता. भोकर जि. नांदेड

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी विधिज्ञा मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची यांचा **अब्दुल शब्बीर पि. अब्दुल बशिर शेख,** रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड यांचा जन्म दिनांक १५/०२/१९७९ रोजी मौजे भोकर, ता. भोकर जि. नांदेड येथे जन्म झाला. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल. देण्यांत आले. आज दिनांक ०३/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय, भोकर

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक ालासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

06 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/5/2026 11:40 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ | पान ३

कर्जाच्या पैशांसाठी सतत तगादा, चिठ्ठी लिहिली अन् तरुणानं उचललं टोकाचं पाऊल

जालना/प्रतिनिधी



पैशांच्या व्यवहारातून वारंवार होणारा त्रास आणि जीवे मारण्याच्या धमक्या यामुळे त्रस्त झालेल्या बीड जिल्ह्यातील एका विवाहित तरुणाने आत्महत्या केल्याची घटना अंबड तालुक्यातील वाळकेश्वर शिवारात उघडकीस आली. विलास शिंदे असे मृत तरुणाचे नाव आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह शेतातील बाभळीच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

विलास मोहनराव शिंदे हा (रा. नवीन नागझरी, ता. गेवराई, जि. बीड) येथील आहे. वाळकेश्वर शिवारातील माणिक जैस्वाल यांच्या गट क्रमांक ४४ मधील शेतात ही घटना घडली. गुरुवारी सकाळी शेतात गेलेल्या काही शेतकऱ्यांना बाभळीच्या झाडाला एका तरुणाने गळफास घेतल्याचे दिसले. त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता संबंधित तरुण मृत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी तातडीने शहागड पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

बदनापूर तालुक्यात खळबळ: गेवराई बाजार शिवारात शेतात लावली गांजाची शेती

२ लाख ८० हजारांच्या मुद्देमाला सह एकटा अटकेत

जालना/ज्ञानेश्वर साळुंके

बदनापूर तालुक्यातील गेवराई बाजार शिवारातील एका शेतात कापसाच्या पिकात लपवून गांजाची बेकायदेशीर लागवड केल्याचा प्रकार बदनापूर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. पोलिसांनी महसूल व कृषी विभागाच्या पथकासह अचानक टाकलेल्या छाप्यामध्ये ५ किलो ६५० ग्रॅम वजनाची आणि २ लाख ८० हजार रुपये किमतीची गांजाची झाडे जप्त केली असून, या प्रकरणी एकास अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई बाजार येथील शेत गट क्रमांक ९० मधील पलाटीच्या शेतात इसम नामे सदाशिव तुळशीराम कान्हेरे (रा. गेवराई बाजार) याने आपल्या कापसाच्या शेतात गांजाची झाडे लावली असून तो रोज त्यांची देखरेख करून खत-पाणी घालून जोपासना करत



असल्याची गोपनीय माहिती बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष कुकलारे व पोलीस पथकाने नायब तहसीलदार श्री. तायडे, उपकृषी अधिकारी श्री. मोहन औटी, तसेच मापारी आणि फोटोग्राफरसह गेवराई बाजार शिवारातील संबंधित शेतात अचानक छापा टाकला. पंचनाम्यादरम्यान आरोपीच्या कापसाच्या शेतात गांजाची ३ झाडे मिळून आली. पोलिसांनी ती झाडे ताब्यात घेऊन मोजणी केली असता ५ किलो ६५० ग्रॅम वजनाचा, २ लाख ८० हजार रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी सदाशिव तुळशीराम कान्हेरे याच्याविरुद्ध बदनापूर पोलीस ठाण्यात कायदेशीर कारवाई करून त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची यशस्वी कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. श्री. तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक मा. श्री. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बदनापूरचे पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक संतोष कुकलारे, पोलीस हवालदार प्रशांत लोखंडे, दीपक कराड, पोलीस कॉन्स्टेबल पी. के. गोलवाल, एस. जे. तडवी आणि अब्दुल बारी शेख यांच्या पथकाने पार पाडली. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

तहसीलदारांसमोरच लिपिक कोतवालात हाणामारी

वडीगोद्री/जालना

शासकीय कार्यालयातील प्रशासकीय शिस्तीचे तीनतेरा वाजवणारी एक धक्कादायक आणि लज्जास्पद घटना जालना जिल्ह्यातील अंबड तहसील कार्यालयात उघडकीस आली आहे. शासकीय कामाचा ताळमेळ आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणाऱ्या तहसीलदारांच्या दालनातच आणि त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत महसूल विभागातील दोन कर्मचाऱ्यांनी एकमेकांची गचांडी धरून फ्री-स्टाईल हाणामारी केली. लिपिक आणि कोतवालामध्ये झालेल्या या राड्याचा संपूर्ण व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर महसूल प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

तहसीलदारांच्या केबिनमध्येच एकमेकांची गचांडी धरली

मंगळवारी दुपारच्या सुमारास अंबड तहसील कार्यालयात नेहमीप्रमाणे दैनंदिन शासकीय कामकाज सुरू होते. त्यावेळी एका लिपिकाने आणि कोतवालाने तहसीलदारांच्या दालनात प्रवेश केला. सुरुवातीला केबिनमध्ये आधी कोण जाणार आणि कोणत्या कामावरून चर्चा होणार, यावरून त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची सुरू झाली. पाहता पाहता हा वाद इतका विकोपाला गेला की, दोघांनीही थेट तहसीलदारांच्या टेबलसमोरच एकमेकांचे कॉलर पकडून धक्काबुक्की सुरू केली. एकमेकांना अश्लील शिवीगाळ करत चाललेल्या या झटापटीमुळे कार्यालयातील इतर कर्मचारी आणि कामानिमित्त आलेले नागरिक स्तब्ध झाले.

'पैशांचा' उल्लेख झाल्याने वाढले गूढ; गैरव्यवहाराचा संशय?

वरवर पाहता हा वाद दालनात प्रवेश करण्यावरून सुरू झाल्याचे भासवले जात असले, तरी व्हायरल झालेल्या व्हिडिओतील संवाद धक्कादायक आहेत. झटापटीदरम्यान दोन्ही कर्मचारी एकमेकांवर पैशांच्या देवाणघेवाणीवरून आणि व्यवहारावरून गंभीर आरोप-प्रत्यारोप करताना स्पष्ट ऐकू येत आहेत. त्यामुळे महसूल विभागातील एखाद्या लाचखोरीच्या किंवा बेकायदेशीर कामातील पैशांच्या वाटपावरून तर हा वाद पेटला नाही ना, असा संशय आता उपस्थित केला जात आहे.

शिक्षक भरतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर!

बदनापूर/अमोल चव्हाण



राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना नियमित शिक्षक भरती करण्याऐवजी 'विषय सहाय्यक' पदे उसनवारी तत्त्वावर भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याने शिक्षण क्षेत्रात नव्या वादाला तोंड फुटले आहे. शासनाच्या या निर्णयाला मराठवाडा शिक्षक संघाने तीव्र विरोध दर्शविला असून, हा निर्णय तातडीने रद्द करून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नियमित शिक्षकांची पारदर्शक भरती करावी, अशी मागणी प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आली आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या २८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार विषय सहाय्यक पदे उसनवारी तत्त्वावर भरण्याची निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी .. या संकेतस्थळावर 'विषय सहाय्यक निवड प्रक्रिया' ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली असून, २८ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे. मात्र, या निर्णयामुळे नियमित शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या पात्र बेरोजगार तरुणांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. शिक्षक होण्यासाठी डी.एड., बी.एड. यांसारखी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता पूर्ण करणे, तसेच शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे अशा अटी शासनाकडून घालण्यात आल्या आहेत. या सर्व पात्रता पूर्ण करूनही हजारो तरुण नोकरीच्या प्रतीक्षेत असताना त्यांना नियमित नियुक्ती देण्याऐवजी उसनवारी तत्त्वावर पदे भरण्याचा मार्ग स्वीकारणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तर शिक्षकांअभावी शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. एका बाजूला पात्रताधारक बेरोजगार तरुण नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत, तर दुसऱ्या बाजूला रिक्त पदांमुळे शाळांमधील शैक्षणिक व्यवस्था प्रभावित होत आहे. अशा परिस्थितीत उसनवारी तत्त्वावरील नियुक्ती हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही, अशी भूमिका शिक्षक संघटनेने मांडली आहे.

शिक्षण व्यवस्थेच्या स्थैर्याशी तडजोड नको!

शिक्षकांची नियमित भरती करण्याऐवजी उसनवारीची पद्धत रूढ करणे म्हणजे शिक्षण व्यवस्थेच्या स्थैर्याशी तडजोड करण्यासारखे आहे.

जिल्हापुरवठा विभाग व तहसील कार्यालयातील भ्रष्टाचाराची चौकशी करा व संगणक ऑपरेटर ची तात्काळ बदली करा-मनसे नेते बाळु जाधव

जालना/प्रतिनिधी

जालना जिल्हा पुरवठा विभाग आणि तहसील कार्यालय जालना येथील पुरवठा विभागा तीलअधिकारी कर्मचारी यांच्याशी संगणमत करून संगणक ऑपरेटर हे मोठ्या प्रमाणात गैर व्यवहार करून भ्रष्टाचार करत आहे.

जिल्हा पुरवठा विभाग आणि तालुका पुरवठा विभाग या दोन्ही ठिकाणी संगणक ऑपरेटर हे नागरिकांची आर्थिक पिळवणूक करत आहे. संगणक ऑपरेटर हे पुरवठा विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्याशी संगणमात करून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पीळवणूक करत आहे.

संगणक ऑपरेटर ला पुढे करून जिल्हा पुरवठा कार्यालय आणि तहसील पुरवठा कार्यालय मधील काही अधिकारी कर्मचारी हे गेल्या अनेक दिवसापासून मोठ्या प्रमाणात गर्भावर करून भ्रष्टाचार करत आहे या भ्रष्टाचाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे अशा भ्रष्टाचारी अधिकारी कर्मचारी व संगणक ऑपरेटरची चौकशी करून सदरील भ्रष्टाचारी अधिकारी कर्मचारी आणि संगणक ऑपरेटर चे तात्काळ बदली करण्याची मागणी मनसे नेते बाळू जाधव यांनी अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ यांना भेटून निवेदना द्वारे केली आहे



जिल्हा पुरवठा विभाग व तहसील कार्यालय जालना येथुन राशन कार्ड ऑनलाईन पध्दतीने करण्याचे काम करण्यात येते. महाराष्ट्र शासनाच्या शिधा वाटपाचे काम ऑनलाईने पध्दतीने झाले असून वेळेची बचत होत आहे. ऑनलाईन पध्दतीने नविन शिधापत्रिका तसेच शिधा पत्रिकेची दुरूस्ती यासारख्या सोयी या ऑनलाईन पोर्टलवर उपलबध आहेत. परंतु जालना जिल्हयातील जिल्हा पुरवठा विभाग व तहसील कार्यालयात अजब प्रकार सुरू असून नविन शिधा पत्रिका व दुरूस्तीकरीता जेवढे नाव तेवढे रक्कम स्विकारून काम करून दिले जात आहे. जिल्हा पुरवठा कार्यालयतील कार्यरत कर्मचारी बाहेरून आलेले ऑनलाईन अर्ज व दुरूस्ती अर्ज आर्थिक व्यवहार पुर्ण झाल्याशिवाय निकाली काढत नाही. आर्थिक व्यवहार पुण न झाल्यास तो अर्ज पेंडीग ठेवण्याचा अजब प्रकार करण्यात येतो. विशेष बाब म्हणजे पेडींग ठेवल्यानंतर काही ठराविक दिवसानंतर तो अर्ज लॉक होतो व त्यासाठी पण रक्कमेची मागणी केली जाते. यामुळे आवश्यक त्या लाभार्थ्यांना हक्काचा व आनंदाचा शिधा मिळत नाही. ही बाब लक्षात आल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मा. अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ यांना निवेदन देण्यात आले आहे. ऑपरेटर संगणक आणि पुरवठा विभागातील अधिकारी कर्मचारी हे संगणमताने नागरिकांची फसवणूक करत आहे

आशा भ्रष्ट कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करण्यात यावीअशी मागणी करण्यात आली. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसे नेते बाळू जाधव यांनी दिला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ : कर्जमुक्तीच्या रकमेचा चौथा हप्ता जमा

जालना,दि.०५(जिमाका) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत दि. ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या व दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या व दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित / फेरपुनर्गठित कर्जास रुपये दोन लाखापर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून यासाठी शासनाने महाआयटीची यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या योजनेसाठी महाआयटी यांनी तयार केलेल्या योजना पोर्टलवर जिल्ह्यातील बँकांनी एकूण १,९९,५२५ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटी यांनी संगणकीय संस्करण करून आधार प्रमाणिकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी ९९,३७१ पात्र लाभार्थ्यांना यापूर्वी कर्जमुक्तीची रक्कम रु. ७५८.२३ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे.

दि. ०४ नोव्हेंबर, २०२६ रोजी सदर योजनेच्या महाआयटी यांनी संगणकीय संस्करण करून आधार प्रमाणिकरण केलेल्या ३९,९८१ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु. ३५३.५२ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे. अशी एकूण चार हप्त्यांमध्ये आधार प्रमाणिकरण केलेल्या १,३९,३५२ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु. १,१११.७५ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. जालन्याच्या एकूण ८,७७९ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु. २४.२७ कोटी तर इतर राष्ट्रीयकृत / खाजगी / व्यापारी / ग्रामीण बँकांचे १,३०,५७३ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु. १०८७.४८ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत पात्र लाभार्थ्यांच्या चार याद्या प्रसिद्ध झालेल्या असून त्यात जालना जिल्ह्यातील एकूण १,७४,२५७ पात्र शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्यापैकी १,४६,१९० शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केलेले असून, अद्यापही २८,०७६ शेतकऱ्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण केलेले नाही. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केल्यानंतरच त्यांची कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा होणार आहे. त्यामुळे सदर यादीतील शेतकऱ्यांनी यादीतील त्यांचा विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड, अंगठा स्कॅन / फिंगर आयडी इ. कागदपत्रे घेऊन जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात किंवा बँक शाखेत जाऊन आधार प्रमाणिकरण करून घ्यावे. ज्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केले नाही त्यांनी लवकरात लवकर आधार प्रमाणिकरण करून घ्यावे. ज्या शेतकऱ्यांनी आधार स्कॅन / फिंगर आयडी ची नोंदणी करावी असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था विष्णु रोडगे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री मत्सयसंपदा योजना अंतर्गत २४ योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

जालना/जिमाका

राज्यातील मच्छिमार, मत्स्यशेतकरी आणि मत्स्यव्यावसायिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी राज्य शासनाने डिजिटल सेवेचे नवे दालन खुले केले आहे. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री श्री. नितेशजी राणे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे आणि मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना (CMMSY) राबविण्यात येत असुन विभागाच्या २४ लाभार्थीभिमुख योजनांसाठी आता महाडीबीटी २.० प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. दि. २८ ऑक्टोबर २०२६, बुधवार रोजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री श्री. नितेशजी राणे यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे महाडीबीटी २.० प्रणाली या सुविधेचा शुभारंभ करण्यात आला.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने राबविण्यात येणा-या विविध लाभार्थीभिमुख योजनांची अंमलबजावणी आता अधिक सुलभ, गतिमान, पारदर्शक व पुर्णपणे डिजिटल करण्यात आली आहे. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजने अंतर्गत राज्यस्तरीय आणि जिल्हा वार्षिक योजनांचा लाभ थेट मत्स्यव्यावसायिकांपर्यंत सुलभ, जलद व पारदर्शक पद्धतीने पोहोचविणे हा उद्देश असुन लाभार्थ्यांकरीता २४ योजना थेट ऑनलाइन स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या ऑनलाइन प्रक्रियेमुळे योजनांच्या अंमलबजावणीत गतिमानता येणार असुन लाभार्थ्यांना अनुदान थेट आधार-संलग्न बँक खात्यात जमा करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. अर्ज प्रक्रिया सुलभ होणे, कागदपत्रांची संख्या कमी होणे आणि सेवांचा जलद निपटारा होणे यामुळे मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे घेता येणार आहे.

ऑनलाइन अर्जासाठी संकेतस्थळ

महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज करण्यासाठी लाभार्थ्यांनी महाडीबीटीच्या https://mahadbt2.maharashtra.gov.in/others या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

मराठवाड्यासाठी रब्बीची ३, उन्हाळी १ आवर्तन मंजूर, ५ नोव्हेंबरपासून पाणी सुटणार!

सतीश घाटगे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश; मुख्यमंत्र्यांचे मानले जाहीर आभार

जालना/ज्ञानेश्वर साळुंके

मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या मागणीला आणि पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे. मराठवाड्यातील दुष्काळी आणि भीषण परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत शासनाने रब्बी हंगामासाठी ३ आणि उन्हाळी १ आवर्तने मंजूर केली असून, येत्या ५ नोव्हेंबरपासून पाण्याचे आवर्तन सुरू होणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून सतीश घाटगे पाटील यांनी मराठवाड्यावर होणाऱ्या पाणी अन्यायाविरोधात आवाज उठवत, ''मराठवाड्याला वाळवंट करू नका, आमच्या हक्काचे पाणी द्या,'' अशी मागणी लावून धरली होती. रब्बीसाठी ३ आणि उन्हाळी २ आवर्तने देण्याची त्यांची आग्रही मागणी होती. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे प्रशासन आणि शासन पातळीवर दखल घेण्यात आली असून रब्बीसाठी ३ आवर्तने मंजूर करण्यात आले आहे. शासनाने घेतलेल्या या दिलासादायक निर्णयानंतर सतीश घाटगे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे जाहीर आभार मानले.

प्रतिक्रिया



मराठवाड्यातील शेतकरी आणि जनतेची पाण्याची भीषण परिस्थिती मा. मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष समजून घेतली आणि रब्बीसाठी ३ आवर्तने तात्काळ मंजूर केली आहे. ५ नोव्हेंबरपासून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला, याबद्दल मी समस्त मराठवाड्यातील जनतेच्या वतीने मुख्यमंत्र्यांचे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानतो. आगामी काळातील परिस्थिती व पाण्याची उपलब्धता पाहून गरज पडल्यास उन्हाळी आवर्तनाबाबत मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा करण्यात येईल. हा मराठवाड्याच्या एकजुटीचा आणि हक्काच्या लढ्याचा विजय आहे.

अडतीयाअसोसिएशनच्या वतीने आ.अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार

जालना/प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य अंदाज समितीचे अध्यक्ष तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर (जेष्ठ शिवसेना नेते)यांच्या पायाला काही दिवसांपूर्वी दुखापत झाली होती. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आज जालना येथील भाग्यनगर परिसरातील दर्शना बंगल्यावर आडतिया असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी आडतिया असोसिएशनचे सचिव विरेंद्रजी रुणवाल,दामोधरजी बजाज, दैनिक कृष्णनिती चे वाणिज्य प्रतिनिधी संजय कानडे,रामेश्वर बोडखे, अरुणजी तापडीया, परेशजी केनिया आणि अनिलजी खंडाळे मारवाडी युवा मंच चे अध्यक्ष चेतनजी बोथरा, मा अध्यक्ष दीनेशजी बरलोटा यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. तसेच पायाला झालेल्या दुखापतीमधुन लवकरात लवकर बरे व्हावेत आणि ते पूर्णपणे ठणठणीत होऊन पुन्हा जनसेवेत सक्रिय व्हावेत, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



ऑक्सिजन सिलेंडर चोरीच्या आंतरजिल्हा गुन्हेगारी सारखळीचा लातूर पोलिसांकडून पर्दाफाश!

११ गुन्ह्यांची उकल; २० ऑक्सिजन सिलेंडरच्या टाक्या, १.७७ लाख रुपये व बोलेरो पिकअपसह १४.५७ लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; एक आरोपी ताब्यात

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी ऑक्सिजन सिलेंडरच्या लोखंडी टाक्या चोरी करून त्यांची विक्री करणाऱ्या आरोपीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत २० ऑक्सिजन सिलेंडरच्या लोखंडी टाक्या, चोरीच्या ५१ सिलेंडर विक्रीतून मिळालेली १ लाख ७७ हजार रुपये रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली बोलेरो पिकअप असा एकूण १४ लाख ५७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांसह नांदेड जिल्ह्यातील मुखेड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एकूण ११ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष पथकास निर्देश दिले होते. दिनांक ०४/११/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ऑक्सिजन सिलेंडर चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत काळे बोरगाव येथील तानाजी चौक परिसरात बोलेरो



पिकअप वाहनामध्ये चोरीचे ऑक्सिजन सिलेंडर विक्रीसाठी घेऊन एक इसम थांबलेला असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बोलेरो पिकअप वाहनासह एक इसम मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने आपले नाव १) उमाकांत सुरेश पानगावकर, वय ३६ वर्षे, रा. पिंप्री अंबा, ता. जि. लातूर असे सांगितले. त्याच्या बोलेरो पिकअप वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ऑक्सिजन सिलेंडरच्या लोखंडी टाक्या मिळून आल्या. तसेच अंगझडतीमध्ये तब्बल ५१ सिलिंडरच्या टाक्या विक्री करून मिळवलेले १ लाख ७७ हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. अधिक चौकशी केली असता सदर ऑक्सिजन सिलेंडरच्या टाक्या अहमदपूर, बुधोडा, जांब व इतर ठिकाणांहून चोरी केल्याचे तसेच रोख रक्कम चोरीच्या सिलेंडर विक्रीतून प्राप्त झाल्याचे निष्पन्न झाले.

अभिलेख तपासणी व जप्त मुद्देमालाच्या आधारे लातूर जिल्ह्यातील विवेकानंद चौक, रेणापूर, अहमदपूर, गांधी चौक, एमआयडीसी, मुरूड, चाकूर, औसा तसेच नांदेड जिल्ह्यातील मुखेड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एकूण ११ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. नमूद आरोपीकडून ऑक्सिजन सिलेंडरच्या २० लोखंडी टाक्या १,४५,०००, रोख रक्कम १,७७,०००, बोलेरो पिकअप वाहन १२,००,००० असा एकूण मुद्देमाल १४,५७,००० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर गुरनं. ३०९/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस या गुन्ह्यात पुढील कायदेशीर कारवाईसाठी हजर करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोउपनि राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार रसूल पठाण, विनोद चलवाड, प्रशांत स्वामी, राजेश कंचे, आनंद हल्ळाळे, गोविंद भोसले, पाराजी पुठेवाड, श्रीनिवास जांभळे, हरी पतंगे, रामदास बाचीफडे यांनी ही कारवाई केली.

उदयगिरीची दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत ज्ञानाची दिवाळी



उदगीर । पाटील मनेश

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत 'ज्ञानाची दिवाळी' हा आगळावेगळा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थ्यांना ग्रंथ, दिवाळीचा फराळ, उटणे, अत्तर व पेन भेट देऊन दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर होते. यावेळी उपाध्यक्ष अँड. प्रकाश तोंडारे, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्ळाळे, उपप्राचार्य तिरुपती सगर, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक प्रा. विलास काकनाळे, कार्यालय अधीक्षक दयानंद स्वामी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल श्रीकांत पंचगोडे यांनी समाधान व्यक्त करून हा कार्यक्रम अत्यंत प्रेरक झाल्याची प्रतिक्रिया दिली. यावेळी बोलताना सचिव डॉ. लखोटिया म्हणाले, दिव्यांग विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला, तर त्यांच्या जीवनात नक्कीच परिवर्तन घडू शकते. या अनोख्या कार्यक्रमात सहभागी होता आल्याचा आनंद व्यक्त करून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. मस्के यांनी कार्यक्रमामागील भूमिका व महाविद्यालय सामाजिक बांधिलकीतून राबवत असलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले, तर आभार प्रा.डॉ. बी.एस. होकरणे यांनी मानले.

औसा पंचायत समिती सभागृहात राडा

उपसभापती सदस्यांत कर्मचाऱ्यांसमोर शाब्दिक चकमक; कर्मचाऱ्यांवर दबाव तंत्राच्या वापराची चर्चा

औसा । बी.डी. उबाळे

लोकशाहीत सत्ताधारी पक्ष चुकीचे अनुपालन करीत असेल तर त्याचं सत्ताधाऱ्यांना जनता आणि विरोधी पक्षाकडून प्रश्न विचारले जातात आणि त्यांची उत्तरे योग्य देणे अपेक्षित असते. मात्र औसा पंचायत समितीच्या (दि. ४ नोव्हे) मासिक सभेत सत्ताधारी मध्येच तु बडा क्या मै बडा! म्हणत उपसभापती व सदस्यामध्ये खडाजंगी झाली त्यामुळे पंचायत समितीच्या आवारात या विषयी जोरदार चर्चा सुरू होती.

निमित्त होते घरकुल आणि नरेगा योजनांच्या विषयावर सभा गाजली. कारण सध्या नरेगा व घरकुल विभागातील कर्मचारी अधिकारी यांना काही सदस्य जाणिव पुर्वक चुकीचे काम करण्यासाठी दबाव टाकत असल्याचे खुप दिवसांपासुन कुजबुज सुरु होती. तो विषय सभापती उपसभापती यांच्या समोर अनेकांनी व्यक्त केला होता असे समजले. लोकशाही मध्ये पद मिळाल्यावर कर्मचारी वर्गावर दबाव टाकत काम करून घेणे योग्य नसल्यांची भूमिका उपसभापती ने घेतली असल्याने नियमानुसार काम करावे असे कर्मचारी यांना सांगितले असल्याचे समजते. तोच विषय वेगळ्या पध्दतीने धरत एका गटाची एका सहीत मंजुरी मिळते, तर दुसऱ्या गटाचे प्रस्ताव महिनोनमहिने का रखडतात, असा सवाल सदस्य यांनी उपस्थित केला होता. परंतु सत्ताधारी आपण असल्याने परत तोच तो विषय योग्य नाही सध्या दुसरे महत्त्वाचे विषयावर चर्चा व्हावी यासाठी उपसभापती यांनी भुमिका मांडल्याने त्यानंतर वादाचे रूपांतर अेरावी, अर्वाच्य भाषेच्या वापरात आणि हातघाईच्या परिस्थितीत झाले. हा केवळ दोन सदस्यांमधील संघर्ष नसून पंचायत समितीतील सत्ताकारण, सैरात कारभार आणि योजनांच्या अंमलबजावणीवर योग्य अंकुश नसल्याने नेतृत्वाची कमतरता निर्माण करणारे हे प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे.



मंजुरीचे निकष काय, प्रस्ताव रखडण्यामागचे कारण काय, बिले का निघत नाही याचे उत्तर शोधण्या ऐवजी एकमेकांना कमी लेखत विषय भरकटविण्यात आले. त्यामुळे सभागृहातील वादाचा केंद्रबिंदू बदलला; योजनांमधील पारदर्शकतेऐवजी सदस्यांमधील सत्ता आणि अधिकार शाहीतील टोकाचा संघर्ष चर्चेत आला. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री अमित देशमुख यांनी औसा मतदारसंघात घरकुलासाठी पैसे द्यावे लागत असल्याचा आरोप केला होता. त्या आरोपावर अद्याप समाधानकारक स्पष्टीकरण समोर आलेले नाही. आता पंचायत समितीच्या सभेतच मंजुरीच्या प्रक्रियेवरून संघर्ष उफाळल्याने तो आरोप पुन्हा चर्चेत आला आहे. किती घरकुले मंजूर झाली, किती प्रस्ताव प्रलंबित आहेत आणि मंजुरीचे निकष काय, याची माहिती प्रशासन जाहीर करणार का?

पंचायत समितीवर नियंत्रण कोणाचे?

सभापती-उपसभापती पदावर असले तरी प्रत्यक्ष कारभारावर पडद्यामागून काही सदस्यांचा प्रभाव असल्याची चर्चा पंचायत समितीच्या आवारात आहे. निर्णयप्रक्रियेत निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांपेक्षा अन्य सदस्यांचीच भूमिका निर्णायक ठरत असेल, तर अधिकृत सत्ताकेंद्र नेमके कुठे आहे? या चर्चेची सत्यता तपासण्याची जबाबदारी प्रशासनाचीही आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी या प्रकरणात भूमिका स्पष्ट करणे अपेक्षित आहे. पंचायत समितीतील हा संघर्ष त्यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक सत्ताव्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित करतो.

कागदावर काम, प्रत्यक्षात बिले?

घरकुल पूर्ण झाले नसताना बिले काढण्यासाठी, काम सुरू नसताना नरेगाची हजेरी भरण्यासाठी कर्मचाऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याची चर्चा गंभीर आहे. हे आरोप खरे असतील, तर गोरगरिबांच्या घरकुलाचा निधी आणि मजुरांच्या हक्काच्या मजुरीशी खेळ सुरू असल्याचा तो प्रकार ठरेल. दबावाला नकार देणाऱ्या अधिकाऱ्यांना अपमानित केले जाते का, याचीही चौकशी व्हायला हवी. जिल्हा प्रशासनाने घरकुल व नरेगाच्या प्रस्तावांची स्वतंत्र तपासणी करून मंजुरी, प्रत्यक्ष कामांची स्थिती आणि निधी वितरणाचा तपशील सार्वजनिक करावा. कारण सभागृहातील गदारोळ संपेल; पण योजनांच्या पैशांचा हिशेब देण्याची जबाबदारी कोणाची? ज्या लाभधारकांनी काम केले आहे त्यांची बिले गेल्या अनेक महिन्यापासून प्रलंबित आहेत याला जबाबदार कोण? औसा आमदार अभिमन्यू पवार यांना यांच्या नेतृत्वामधून औसा पंचायत समिती प्रथमच भाजपच्या ताब्यामध्ये आली आहे परंतु यावर सार्वजनिक लोकोपयोगी कामे होण्याऐवजी नेतृत्व गुणाच्या अभावामुळे विकास बाजूलाच राहिला आणि पदाधिकाऱ्यांमध्येच मै... मै तू.. तू लागल्याने जनतेचा विकास कसा होणार? ही बाब औसा आमदार पवार यांनी गांभीर्याने घेऊन पक्षांतर्गत असलेली गटबाजी दूर करण्यासाठी पक्षाच्या नेतृत्वगुणाची कसोटी लागणार काय? असे मत नागरिकाकडून व्यक्त केले जात आहे.

लातूर येथे तालुकास्तरीय संवाद कार्यशाळा उत्साहात

लातूर । संतोष सोनवणे

स्वयम् शिक्षण प्रयोग यांच्या वतीने लातूर येथे दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुकास्तरीय संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेची सुरुवात प्रेमा ताई यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पंचायत समितीचे कार्यकारी अधिकारी काकासाहेब जाधव, महिला व बालकल्याण विभागाच्या संरक्षण अधिकारी तोडगीरे, जिल्हा उद्योग केंद्राचे दीपक येळीकर, ठउद च्या सिंधू मुळे तसेच स्वयम् शिक्षण प्रयोगच्या भारती मॅडम, लीला मॅडम आणि स्वाती मॅडम उपस्थित होत्या. या कार्यशाळेत तालुक्यातील ९५ महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गायत्री वाघमारे यांनी केले, तर प्रास्ताविक भारती मॅडम यांनी केले. यावेळी आठ महिलांनी आपले अनुभव कथन करून विविध उपक्रमांमुळे त्यांच्या जीवनात झालेल्या बदलांची माहिती दिली. यावेळी पंचायत समितीचे कार्यकारी अधिकारी



काकासाहेब जाधव यांनी 'विकसित भारत – जी राम जी योजने' विषयी सविस्तर माहिती दिली. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच वार्षिक चारा नियोजनाबाबतही मार्गदर्शन केले. महिला व बालकल्याण विभागाच्या संरक्षण अधिकारी तोडगीरे मॅडम यांनी महिलांचे हक्क, अधिकार आणि त्यांच्यासाठी असलेल्या कायद्यांविषयी माहिती दिली. तसेच महिलांनी आपल्या अधिकारांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.

जगधने सर यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्राचे महत्त्व व त्याचे फायदे समजावून सांगितले. तसेच महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज कसा भरावा, याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांना शासकीय योजना, रोजगाराच्या संधी, महिला हक्क, कृषीविषयक सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती मिळाली. महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना सक्षम बनविणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाचा समारोप लीला मॅडम यांनी केला. कार्यशाळेमुळे महिलांना शासकीय योजनांची माहिती मिळण्यासोबतच स्वतःच्या हक्कांविषयी आणि विकासाच्या संधींविषयी नवी दिशा मिळाली.

कुलकर्णी, जोशी परिवाराचे सहकार मंत्री नामदार पाटील यांच्याकडून सांत्वन

चाकूर । प्रतिनिधी

येथील जगत जागतिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सर्वोत्तम कुलकर्णी यांचे काल दुःखद निधन झाल्यानंतर आज राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्या चाकूर येथील निवासस्थानी सांत्वनपर भेट देत कुटुंबीयांना धीर दिला. तसेच सुधाकर जोशी यांचेही काही दिवसापूर्वी दुःखद निधन झाले होते त्यांच्याही कुटुंबाला सांत्वन्पर भेट देत कुटुंबीयांना धीर दिला.



यावेळी त्यांच्या समवेत चाकूरचे नगराध्यक्ष भागवत फुले, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संदीप शेटे, अनिल वाडकर, मोहनराव कुलकर्णी, माजी नगरसेवक रवींद्र निळकंठ, सह आदी उपस्थित होते.

किडीज इन्फो पार्कच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा; श्रेयशची राज्यस्तरावर धडक!

लातूर । प्रतिनिधी

किडीज इन्फो पार्क स्कूल, पेठ येथील विद्यार्थ्याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. शाळेचा विद्यार्थी श्रेयश कदम याने नांदेड येथे आयोजित विभागीय स्तरावरील कराटे स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत यश संपादन केले असून, त्याची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विभागीय स्पर्धेमध्ये श्रेयशने आपल्या उत्कृष्ट खेळतंत्र, चपळता, आत्मविश्वास, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली. सातत्यपूर्ण सराव, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या बळावर त्याने हे यश संपादन केले आहे. त्याच्या या कामगिरीमुळे आता त्याला राज्यस्तरावर



आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे. श्रेयशच्या या यशामध्ये क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित प्रशिक्षण आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे. शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. याच प्रयत्नांचे फलित म्हणून विद्यार्थी विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये यश संपादन करत आहेत.


या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका प्रीती शहा, उपप्राचार्या नैना पाटील, प्री-प्रायमरी स्कूल डायरेक्टर इशिका शहा, स्कूल कोऑर्डिनेटर रमेश्वर सगरे तसेच क्रीडा शिक्षक अविनाश पवार, अजित आडे व पल्लवी राठोड यांनी श्रेयश कदमचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्वाधार योजनेतील ATKT नियम आणि 'Sent Back' अर्जांच्या समस्यांवर दिपालीताई आदमाने यांचा पुढाकार!

लातूर । संतोष सोनवणे

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ATKT नियमांमुळे तसेच ऑनलाइन अर्ज वारंवार "Sent Back' होत असल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्यांची गांभीर्याने दखल घेत जिल्हा परिषद सदस्या सौ. दिपाली प्रदीप आदमाने यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी समाजकल्याण विभागाकडे ठाम भूमिका मांडली आहे. यासंदर्भात त्यांनी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, लातूर यादव गिरीजाबाई ईश्वर गायकवाड यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी निदर्शनास आणून दिल्या.

स्वाधार योजनेचा लाभ घेणारे अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करून उच्च शिक्षण घेत आहेत. मात्र, प्रत्येक सेमिस्टरमधील ATKT स्वतंत्रपणे ग्राह्य धरणे, ATKT लागल्यानंतर स्वाधार योजनेचा लाभ बंद होणे तसेच ऑनलाइन



अर्ज वारंवार "Sent Back' होणे, अशा कारणांमुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे या नियमांचा विद्यार्थीहिताच्या दृष्टीने पुनर्विचार होणे आवश्यक असल्याचे दिपालीताई आदमाने यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी समाजकल्याण विभागाकडे पुढील महत्त्वपूर्ण मागण्या केल्या.

दिपालीताई आदमाने यांनी मांडलेल्या या मागण्यांची सहाय्यक आयुक्त यादव गिरीजाबाई ईश्वर गायकवाड यांनी सकारात्मक दखल घेतली. त्यांनी तात्काळ वरिष्ठ अधिकारी तथा समाजकल्याण आयुक्त यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतला. त्यामुळे स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती असलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणींमुळे थांबू नये!

शैक्षणिक प्रवासात ATKT लागणे ही विद्यार्थ्याची जाणीवपूर्वक केलेली चूक नसते. विविध शैक्षणिक, कौटुंबिक व आर्थिक अडचणींवर मात करून विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा परिस्थितीत केवळ ATKT किंवा तांत्रिक कारणांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे अन्यायकारक आहे. स्वाधार योजनेचा मूळ उद्देशच वंचित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक आधार देणे हा असल्याने नियमांची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य मिळाले पाहिजे, अशी भूमिका दिपालीताई आदमाने यांनी मांडली. त्यांच्या या पुढाकारामुळे लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो स्वाधार लाभार्थी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फुटली आहे. आता शासन व समाजकल्याण विभाग या मागण्यांवर कोणता निर्णय घेतात, याकडे विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष लागले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांसाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिपालीताई आदमाने यांनी घेतलेला हा पुढाकार निश्चितच महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

शेतकऱ्यांची दिवाळी गोड; विलास कारखान्याकडून ऊस उत्पादकांच्या खात्यात बिलाची रक्कम जमा

लातूर । प्रतिनिधी

सहकार आणि साखर उद्योगातून सभासद, ऊसउत्पादक व कामगारांच्या हित जोपासणारे विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी आणि विलास सहकारी साखर कारखाना लि., तोंडार, उदगीर या दोन्ही कारखान्यांच्या वतीने गाळप झालेल्या ऊस उत्पादकांना दीपावली सणापूर्वीच पहिला हप्ता प्रति टन रु. ३ हजार प्रमाणे खात्यात जमा करण्यात आला आहे. मांजरा परिवारातील साखर कारखाने यंदाच्या गाळप हंगामात उसाला प्रति टन तीन हजार रुपये पहिली उचल देणार असल्याची घोषणा सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली होती. गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या घोषणेला बांधील राहून मराठवाड्यात सर्वाधिक ऊसदर दिला जाईल असे सांगीतले होते.

विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळीच्या वतीने दीपावलीपूर्वी बँक खात्यात पहिला हप्ता म्हणून १६ कोटी ८ लाख ९३ हजार रुपये (प्रति मेट्रिक टन ३,०००/- प्रमाणे) जमा करण्यात आले आहेत. या कारखान्याचे आज अखेर गाळप दिवस १४ झाले असून, यादरम्यान ७३,९७० मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. या गाळपातून आज अखेर ६१,६६० साखर पोती (क्विंटल) उत्पादित झाली असून कारखान्याचा आजअखेर साखर उतारा ८.५०% इतका राहिला आहे. तसेच, विलास सहकारी साखर कारखाना लि., तोंडार, उदगीरच्या वतीने दीपावलीपूर्वी बँक खात्यात पहिला हप्ता म्हणून १७ कोटी ३० लाख रुपये (प्रति मेट्रिक टन ३,०००/- प्रमाणे) जमा करण्यात आले आहेत. या कारखान्याचे आज अखेर गाळप दिवस १९ झाले असून, यादरम्यान ७३,२८० मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. या गाळपातून आज अखेर ६३,४०० साखर पोती (क्विंटल) उत्पादित झाली असून कारखान्याचा आजअखेर साखर उतारा ८.८५७% इतका मिळाला आहे.

सद्यस्थितीत भागात दुष्काळजन्य परिस्थिती असून पाण्याअभावी ऊस पिकाचे नुकसान होत आहे. हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कारखान्याचे दैनंदिन गाळप वाढवून नोंद झालेल्या सर्व ऊसाचे वेळेत गाळप करण्याचा मानस संचालक मंडळाचा आहे. मराठवाड्यात अंतिम ऊसदर सर्वाधिक राहील यासाठी प्रयत्न केले जातील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचा ऊस कारखान्यास गाळपासाठी आला आहे, त्यांनी संबंधित बँक शाखेतून बिलाची रक्कम उचल करून घ्यावी आणि जास्तीत जास्त ऊस विलास कारखान्यास द्यावा, असे आवाहन चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, व्हाईस चेअरमन माजी आमदार वैजनाथराव शिंदे, संचालक मंडळ व कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले आहे.

सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व कामगार बंधू-भगिनींना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! विलासराव देशमुख यांची प्रेरणा, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विलास सहकारी साखर कारखाना नेहमीच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. विक्रमी गाळप साध्य करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी कारखान्याला जास्तीत जास्त ऊस पुरवठा करून सहकार्य करावे. आपली ही दिवाळी आनंदात आणि गोड जावो, हीच सदिच्छा!

– माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संगिता काळे (धाराशिव जिल्हा प्रतिनिधी)
मो.9588601740 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती | शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ | पान नं. ५

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

दुष्काळाच्या संकटात मजुरांच्या हाताला काम; रोजगारनिर्मितीसाठी जिल्हा प्रशासनाची विशेष मोहीम गावागावांत रोजगार हमीची कामे सुरु करण्यावर भर

धाराशिव/जिमाका

पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील पिके करपली,शेतीची कामे थांबली आणि हातावर पोट असलेल्या शेतमजुरांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे.अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील कष्टकरी कुटुंबांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. दुष्काळामुळे रोजगाराच्या संधी कमी झालेल्या मजुरांच्या हाताला काम मिळावे,त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू राहावा आणि रोजगारासाठी गाव सोडण्याची वेळ येऊ नये,या उद्देशाने जिल्ह्यात विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) योजनेंतर्गत मजुरांना काम उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या कामांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरासह आठही तालुक्यांत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

धाराशिव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.परिणामी, ग्रामीण भागातील मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होणे कठीण झाले आहे.शेतीवर अवलंबून असलेल्या अनेक कुटुंबांच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे.अशा संकटाच्या काळात रोजगार हमीची कामे ही केवळ रोजगार उपलब्ध करून देणारी योजना न राहता ग्रामीण कुटुंबांना आर्थिक आधार देणारी महत्त्वाची व्यवस्था ठरते.गावातच काम मिळाल्यास मजुरांच्या हातात पैसा येऊन कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्यास मदत होणार आहे.

मजुरांच्या हाताला काम देण्यास सर्वोच्च प्राधान्य

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) योजनेंतर्गत कामाची मागणी नोंदविणाऱ्या मजुरांना संबंधित ग्रामपंचायत स्तरावर विहित कालावधीत काम उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.तसेच,मजुरांनी कामाची मागणी केल्यानंतर त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती कार्यवाही करावी,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने आदेश निर्गमित केले असून,गावपातळीपासून तालुका आणि जिल्हास्तरापर्यंत समन्वय राखून रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

रोजगार हमीची कामे ठरणार दुष्काळात आधार

दुष्काळाचा सर्वाधिक फटका शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजूर,भूमिहीन आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांना बसतो. पेरणी,निंदणी,खुरपणी,काढणी यांसारखी हंगामी शेतीकामे कमी झाल्याने मजुरांच्या उत्पन्नाचे साधनही हिरावले जाते.अशा वेळी रोजगार हमी योजनेंतर्गत उपलब्ध होणारे काम कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे ठरते.

रोजगार हमीच्या माध्यमातून जलसंधारण,मृदसंधारण,पाणलोट विकास आणि अन्य पात्र सार्वजनिक उपयोगाची कामे हाती घेतल्यास मजुरांना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच गावातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनालाही हातभार लागू शकतो.विशेषतः पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गावांमध्ये जलसंधारणाची कामे भविष्यातील दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

गावातच रोजगार उपलब्ध झाल्यास मजुरांना कामासाठी शहरांकडे स्थलांतर करण्याची गरज कमी होऊ शकते.त्यामुळे मुलांचे शिक्षण,कुटुंबातील वृद्धांची देखभाल आणि दैनंदिन जीवनातील स्थैर्य टिकविण्यासही मदत होणार आहे

जिल्हास्तरावर दोन अधिकाऱ्यांकडे जबाबदारी

रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना वेळेत काम उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (रोहयो) श्रीमती.कांचन जाधव आणि जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील सहाय्यक गटविकास अधिकारी (व्ही.बी.जी.रामजी) श्रीमती.स्नेहल कदम यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शासनाने शेतकऱ्याला दिलेली ५००० ची मदत केली मुख्यमंत्र्यांना तहसीलदाराच्या मार्फत परत

धाराशिव/प्रतिनिधी



खरीप हंगामात सोयाबीन, मूग ,उडीद पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पावसातील खंड आणि पिकांच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत म्हणून शासनाने पाच हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. परंतु एवढ्या पैशांमध्ये शेतकऱ्यांनी दिवाळी कशी साजरी करायची झालेला खर्च शेतातून निघाला नाही. एवढ्या पैशांमध्ये काय होणार म्हणूनतुळजापूर तालुक्यातीलजिल्हा परिषद सदस्य सौ प्रतीक्षा गोपाळ सुरवसे यांचे पती माजी सरपंच गोपाळ सुरवसे यांनी शासनाने दिलेली ५०००/- रु. ची दुष्काळी मदत आज तुळजापूर येथील तालुका प्रशासनाद्वारे तहसीलदार साहेब यांना भेटून लेखी निवेदन व शेतातील गजरासहित पाच हजार रुपये परत करून तुटपुंजी मदतीत आम्ही दिवाळी साजरी करणार नाही असा संदेश घेऊन शासनाचा निषेध करण्यात आला.गोपाळ सुरवसे हे कर्तव्यदक्ष समाजसेवक असून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना स्वतंत्र विद्युत डी.पी., गरजवंत एकल महिलांना दुष्काळाचा सामना करण्यासाठी शिलाई मशीन, युवकांना खेळाचे साहित्य व शेतमजूरांच्या हाताला काम देण्यासाठी सदैव प्रयत्नशील असणारे तुळजापूर तालुक्यातील प्रगतशील शेतकरी आहेत. यावेळी तुळजापूर येथील तहसीलदारांना निवेदन देते वेळेस शिवसेना (उबाठा) तालुका अध्यक्ष जगन्नाथ गवळी, हरिष जाधव, सुरेश कोकरे व ज्ञानेश्वर मुळे इत्यादी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जल्लोष नव्हे, तर शिक्षणसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संकल्प!

आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिराढोणमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

शिराढोण/बिलाल कुरेशी

वाढदिवस म्हटले की उत्सव, जल्लोष आणि शुभेच्छांचा वर्षाव; मात्र या उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार आणि निसर्गाच्या संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचा अनोखा आदर्श शिराढोण येथे पाहायला मिळाला. तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्रशाला, शिराढोण येथे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर गावातील प्रत्येक वृक्षाचे संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

सौ. अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या तब्बल १५ वर्षांपासून शिराढोण येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम



सातत्याने राबविण्यात येत आहे. या सेवाभावी परंपरेला पुढे नेत यंदा आमदार राणादादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या प्रेरणेने हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात आला.

दुष्काळाच्या सावटात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधार!

सध्या परिसरात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांसमोर अनेक आर्थिक अडचणी उभ्या आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, त्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी आणि शिक्षणाची प्रेरणा कायम राहावी, या उदात्त हेतूने वह्यांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष समाधानाचा ठरला.

यावेळी शाळेतील शिक्षिका डासाळकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आमदार राणादादा पाटील यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्याची तसेच त्यांनी राबविलेल्या विविध विकासात्मक उपक्रमांची माहिती दिली. त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी समाजसेवा, नेतृत्व आणि सामाजिक जबाबदारीची प्रेरणा घ्यावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. किरण पाटील यांचा अनोखा निर्धार; पुढील वाढदिवसापर्यंत प्रत्येक झाडाला मिळणार पाणी!

पान १ वरून...

लाचखोरांचा अड्डा!

आहे. बीड नगरपरिषदेचा रमाई घरकुल विभाग सध्या सर्वसामान्यांचे अश्रू पुसणारा नव्हे, तर भ्रष्टाचाराचा आणि लाचखोरीचा मुख्य अड्डा बनल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, मूळ पद सफाई कामगाराचे असताना त्याला घरकुल विभागाच्या चाव्या सोपवण्यात आल्या आहेत. यामुळेच या विभागात एका 'बकासुरा'ची राजवट सुरू असून, जोपर्यंत चिरीमिरी मिळत नाही, तोपर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदानाचा दमडीही टाकला जात नसल्याची संतप्त चर्चा संपूर्ण शहरात सुरू आहे. ऊसतोड कामगार, मिस्त्री कामगार, हॉटेलमधील वाढपी, दिवसभर घाम गाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे कष्टकरी... या सर्व घटकांनी डोक्यावर छप्पर मिळावे म्हणून कसेबसे रमाई घरकुल योजनेत नाव नोंदवले. मात्र, मंजूर झालेल्या घरांचे हफ्ते बँक खात्यात वर्ग करण्यासाठी या गरिबांकडून उघडउघड हजारो रुपयांची लाच उकळली जात असल्याची चर्चा सुरू आहे. ज्यांच्याकडे लाच देण्यासाठी खिसा रिकामा आहे, त्यांना एक-एक हफ्त्यासाठी पालिकेच्या पायऱ्या झिजवायला लावून महिनोमहिने ताटकळत ठेवले जाते.आधी पैसे मोजा, मगच हफ्त्याची फाईल पुढे जाईल, असा अलिखित नियमच या विभागात रूढ झाल्याचे लाभार्थी उघडपणे सांगत आहेत! लाचखोरीचा हा नंगानाच एवढ्यावरच थांबत नाही. शहरात जे आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि वजनदार आहेत, ज्यांचे प्रत्यक्ष जागेवर साधे वीटभरही बांधकाम झालेले नाही, अशा मलिदा पुरवणाऱ्या धनदांडग्यांना तात्काळ तिन्हीच्या तिन्ही हफ्ते बिनदिक्कत जमा करण्यात आल्याचे बोलले जात आहे. एका बाजूला बांधकामासाठी विटा आणून बसलेला मजूर पैशांअभावी घराचे काम अर्धवट ठेवून डोळ्यात पाणी आणतोय, तर दुसऱ्या बाजूला कोणतीही पाहणी न करता कागदोपत्री घोडे नाचवून लाखो रुपयांचा सरकारी निधी लाटला जात आहे. यावरून या विभागात लाचखोरीचे एक सुसंघटित रॅकेटच कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे. कष्टकऱ्यांच्या तोंडचा घास पळवणारा हा बकासुर नेमका कोण? पालिकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांना डावलून नेमके कोणाच्या आशीर्वादाने एका सफाई कर्मचाऱ्याला या टेबलवर बसवून गोरगरिबांची लूट चालवली जात आहे? हा खरा चेहरा आता जनतेसमोर येणे गरजेचे आहे. जर मुख्याधिकाऱ्यांनी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यालयात बसून कागदे तपासण्याऐवजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन लाभार्थ्यांच्या घरांची स्थळ पाहणी केली, तर विनाबांधकाम हफ्ते उचलणाऱ्यांचे आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या रॅकेटचे पितळ उघडे पडल्याशिवाय राहणार नाही.

.....

सभापती सौ.जयश्रीताई गित्ते

प्रशासनाने ठेवली आहे. अत्यल्प पावसामुळे परळी शहरावर दुष्काळाचे सावट असून, शहराचा प्रमुख पाणीपुरवठा स्रोत असलेल्या वाण प्रकल्पात केवळ १७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासनाला पाणीपुरवठ्याचे काटेकोर नियोजन करावे लागत आहे. आ. धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे, लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे सर, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी आणि मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळी काळात नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी नगर परिषद कटिबद्ध असल्याचे सभापती गित्ते यांनी सांगितले. दिवाळीपर्यंत नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवण्याच्या निर्णयामुळे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, नळांना तोट्या बसवाव्यात, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि पाणीगळती किंवा तांत्रिक अडचण आढळल्यास तातडीने नगर परिषद पाणीपुरवठा विभागाला कळवावे, असे आवाहन सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी केले आहे.

शेवटच्या पानावरून...

वानटाकळी

झालेल्या या विशेष सभेत अविश्वास ठरावावर मतदान घेण्यात आले. यामध्ये ठरावाच्या बाजूने ८ मते पडली, तर विरोधात एकही मत पडले नाही. त्यामुळे अविश्वास ठराव मंजूर झाला.

मनमानी कारभारासह अनेक गंभीर आरोप

सरपंच गंगाबाई हांगे या ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर मनमानी व एकतंत्री कारभार करीत असल्याचा आरोप सदस्यांनी केला होता. तसेच नियमित मासिक सभा घेतल्या जात नाहीत, ग्रामसभा नियमित होत नाहीत, गावाच्या विकासकामांचा व प्राप्त निधीचा हिशोब सदस्यांना दिला जात नाही, ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्या तसेच आरोग्य व स्वच्छतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे आरोप अविश्वास अर्जात नमूद करण्यात आले होते. या विविध कारणांचा उल्लेख करून ग्रामपंचायत सदस्य तुकाराम देविदास मुंडे, अनिल शिवराम जाधव, सौ. हौसाबाई आत्माराम गायके, सौ. गंगा अनिल गायके, सौ. अर्चना उत्तम कसबे, प्रतिक्षा राजाभाऊ भाकरे आणि सौ. कोमल भैय्यासाहेब घाडगे या सात सदस्यांनी दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी तहसीलदारांकडे अविश्वास ठराव दाखल केला होता.

सदस्यांच्या एकजुटीची राजकीय वर्तुळात चर्चा

अखेर विशेष सभेत ८ विरुद्ध ० मतांनी अविश्वास ठराव मंजूर झाल्याने ग्रामपंचायत सदस्यांची एकजूट अधोरेखित झाली आहे. हा गावाच्या विकासासाठी आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी घेतलेला निर्णय असल्याची भूमिका सदस्यांकडून व्यक्त करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेची माहिती ग्रामपंचायत सदस्य तुकाराम देविदास मुंडे यांनी दिली. अविश्वास ठराव मंजूर झाल्याने वानटाकळी ग्रामपंचायतीच्या राजकारणात आता पुढे कोणती नवी समीकरणे तयार होतात, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

.....

राजेभाऊ फड

दुष्काळाने ग्रामस्थांचे हाल पाहून राजेभाऊ फड यांचे मन हेलावले; साधला थेट संवाद

साहित्य किट वाटप सोहळ्यादरम्यान मा. राजेभाऊ फड यांनी उपस्थितांशी अत्यंत जिव्हाळ्याचा संवाद साधला. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना ते म्हणाले, ''आज शेतकरी आणि शेतमजूर अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. दुष्काळामुळे शेतात पीक नाही आणि हातात पैसा नाही, अशा वेळी सण साजरा करणे अत्यंत अवघड झाले आहे, याची मला पूर्ण कल्पना आहे. हा केवळ एक मदतीचा हात नसून, या संकटाकाळात मी आणि आमचे कुटुंब तुमच्या सोबत आहोत, हा विश्वास देण्याचा हा प्रयत्न आहे.''

दिवाळी साहित्य किटचे वाटप; ग्रामस्थांकडून समाधान

कन्हेरवाडी येथील प्रत्येक कुटुंबाला दिवाळी आनंदात साजरी करता यावी, यासाठी या किटमध्ये दिवाळीसाठी लागणारे आवश्यक साहित्यांचा समाविष्ट करण्यात आला आहे. गावातल्या शेवटच्या घटकापर्यंत ही मदत घर पोहोच पोहोचवण्यात आली. या उपक्रमामुळे दुष्काळाच्या सावटात असलेल्या कन्हेरवाडी गावात एक प्रकारे आशेचा आणि समाधानाचा किरण निर्माण झाला आहे.

लोकप्रतिनिधी असावा तर असा!

सध्याच्या कठीण काळात केवळ राजकीय घोषणा न करता, थेट बांधावर आणि गावात येऊन सर्वसामान्य जनतेचे अश्रू पुसण्याचे काम मा. राजेभाऊ फड यांनी केले आहे. लोकप्रतिनिधी असावा तर असा, अशा भावना यावेळी कन्हेरवाडीतील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुण शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला कन्हेरवाडी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, तरुण मंडळी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ, शेतकरी व महिला उपस्थित होत्या. सर्वांनी राजेभाऊ फड यांच्या या कौतुकास्पद आणि संवेदनशील उपक्रमाबद्दल मनापासून आभार मानले.

.....

तळेगाव

आहे. कै. हनुमंतराव मुंडे (बापू) हे धार्मिक वृत्तीचे, वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत पाईक होते. आयुष्यभर त्यांनी माणुसकी, परोपकार आणि अध्यात्माची कास धरली. कोणालाही दुखावायचे नाही, कोणाच्या अडचणीत भर घालायची नाही, तर जमेल तशी मदत करायची, हा त्यांचा स्वभाव होता. दररोज सकाळी आणि संध्याकाळी गावातील हनुमानाचे दर्शन घेणे हा त्यांच्या दिनक्रमाचा अविभाज्य भाग होता. वडिलांनी मुलांवर केलेले संस्कार आज त्यांच्या सामाजिक कार्यातून दिसून येत आहेत. याच संस्कारांचा आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे चालवत सूर्यभान (नाना) मुंडे यांनी दुष्काळाच्या काळात गावातील कुटुंबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा प्रयत्न केला. राजकारणासोबतच अध्यात्म आणि परमार्थाची आवड असलेल्या नाना मुंडे यांना वडिलांच्या बोटाला धरून कीर्तनाला जाण्यापासूनच वारकरी संप्रदायाची ओळख झाली. ग्रामपंचायतीपासून सार्वजनिक जीवनात काम करताना त्यांनी गावातील दवाखाना, विवाह सोहळे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींमध्ये मदतीचा हात दिला आहे. गावातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी तत्पर राहणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. विशेष म्हणजे, सध्या दुष्काळामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असताना केवळ औपचारिक मदतीपुरते मर्यादित न राहता प्रत्येक कुटुंबापर्यंत आपुलकी पोहोचविण्याचा प्रयत्न या साखर वाटपातून करण्यात आला. दिवाळीचा सण प्रत्येकाच्या घरात गोड व्हावा, हीच या उपक्रमामागील भावना असल्याचे मुंडे परिवाराने व्यक्त केले. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।। संत तुकाराम महाराजांच्या या अभंगाप्रमाणे निसर्गातील प्रत्येक घटकाशी नाते जोडणारी वारकरी विचारधारा माणसामाणसांतील आपुलकी आणि परोपकाराची शिकवण देते. कै. हनुमंतराव मुंडे यांच्या विचारांचा हाच वारसा त्यांच्या परिवाराने कृतीतून जपला आहे. स्व. हनुमंतराव मुंडे यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे चालवत मुंडे परिवाराने केलेल्या या उपक्रमाचे गावातील सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. दुष्काळाच्या कठीण परिस्थितीतही माणुसकीचा हात पुढे करून तळेगावकरांची दिवाळी गोड करण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणारा ठरला. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडिलांच्या स्मरणार्थ साखर वाटपातून सामाजिक बांधिलकी जपली

''माझे वडील कै. हनुमंतराव मुंडे (बापू) यांनी नेहमीच तळेगावला एक कुटुंब मानले. त्यांनी दिलेले माणुसकी आणि वारकरी विचारांचे संस्कार पुढे चालविणे हेच आमचे कर्तव्य आहे. यंदा दुष्काळामुळे ग्रामस्थ अडचणीत असताना त्यांची दिवाळी गोड व्हावी, प्रत्येक कुटुंबाच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या भावनेतून पाच किलो साखरेची सप्रेम भेट दिली आहे. हा उपक्रम म्हणजे वडिलांच्या स्मृतींना वाहिलेली खरी आदरांजली आहे,''संत तुकाराम महाराजांनी सांगितले आहे, जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले या संतविचाराप्रमाणे गरजूंच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच खरी माणुसकी आहे. वडिलांच्या आशीर्वादाने यापुढेही गावातील प्रत्येक कुटुंबाच्या सुख-दुःखात सहभागी राहून सामाजिक कार्य सुरू ठेवण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील, अशी प्रतिक्रिया आ. धनंजय मुंडे यांचे विश्वासू कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान (नाना) मुंडे यांनी व्यक्त केली.

.....

हादगाव

शेख यांची तर उपध्यक्षपदी आशोक नरवडे यांची एकमताने निवड करण्यात आली. या प्रसंगी सागर वसंत उमाप,वर्षा मनोहर लांडगे,सविता दत्ता कऱ्हाळे,गंगा विठ्ठलराव थीटे आदी उपस्थीत होते. या निवडी बद्दल अशपाक मुसा शेख व आशोक नरवडे यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दैनिक जगमित्र ०६/११/२०२६

CHANGE IN NAME

DECLARATION I declare this publication about change in my name,
Old name :-Shaikh Anwar shaikh Lal
New name :- shaikh Anwar Lal
Old and new Address:-S/O. Shaikh Lal, peth mohalla, parli, Beed, Maharashtra, Pin code:-431515

जाहीरनामा

कार्यालय नगर परिषद, किल्ले धारुर जि.बीड
क्र.२६०४/किनप/नांव लावणे (गुंठेवारी)

दिनांक ४ नोव्हेंबर २०२६
प्रकरण महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २०२१ चे कलम ४ (१) अन्वये
अर्ज श्री तुकाराम बापुराव शिनगारे
प्रकरण :- सर्व्हे नं. ६२६ वर खरेदीखत /सातबारा/ वारसा पत्रक क्र.३१४/२०१९
साईन पुर्वपश्चिम ५० फुट दक्षिणोत्तर ५० फुट अन्वये यांचे नाव लावणे संबंधी
श्री. तुकाराम बापुराव शिनगारे
ज्याचे नांव रजिस्टर महसुल जायदादला आहे. हे बदलण्यास इसम मजकुरने अर्ज दिला आहे. या विषयी ज्या कोणास तक्रार असेल त्यांनी या जाहीर नाम्याच्या प्रसिध्दी पासुन (१५) पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला तक्रारी अर्ज द्यावा नसता मुदत संपल्यावर कायद्याप्रमाणे रजिस्टर महसुल जायदादला अर्जा प्रमाणे नांव बदलण्यास येईल. आणि मग कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
चतुर : सिमा
पुर्व : रोड
पश्चिम : बालासाहेब शिनगारे
दक्षिण : रोड
उत्तर : जनता प्राथमिक विद्यालय
तपशील

मुख्याधिकारी
नगर परिषद, किल्ले धारूर

जा.क्र.४४०९/२०२६-२७
कार्यालय, नगर परिषद, परळी वै.
जिल्हा बीड, दिनांक : ५/११/२०२६

जाहिरनामा

प्रकरणः मालमत्ताकर नोंदवहित अर्जदाराचे नावाची नोंद घेणे बाबत.

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, श्री/श्रीमती **गोपाळ गणपत इगवे व इतर** यांनी खालील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे घर क्र./प्लॉट/पैकी जागेस नंबर नांव नोंदविण्यास **समंतीपत्रा** चे आधारे कार्यालयाकडे अर्ज केलेला आहे. घर क्र. १३४५, वार्ड क्र.१, शीट नं. चालता नं., सी.टी.एस.नं. , **सर्व्हे नं.१५/७** मोहल्ला : गंगासागर नगर, जागेची चर्तुसिमा, जागेचे मोजमाप : २०६.३१ चौ.मी.
पुर्वेस : रस्ता
पश्चिमेस : सावंत यांची जागा
दक्षिणेस : जाधव यांची जागा
उत्तरेस : पांचाळ यांची जागा
सदरी घरास/जागा **गणपत हरीभाऊ इगवे** ची नोंद या कार्यालयातील मालमत्तकर नोंदवहित आहे. / यानी विक्री केली आहे. सदरी अर्जप्रमाणे नांव नोंदणी संबंधी कोणास काही आक्षेप हरकत किंवा सुचना करावयाची असेलतर त्यांनी या जाहिरनाम्याचे प्रसिद्ध तारखेपासून १५ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यासह लेखी अर्ज करावा नंतर आलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, परळी वैजनाथ

जा.क्र.४४००/२०२६-२७
कार्यालय, नगर परिषद, परळी वै.
जिल्हा बीड, दिनांक : ४/११/२०२६

जाहिरनामा

प्रकरणः मालमत्ताकर नोंदवहित अर्जदाराचे नावाची नोंद घेणे बाबत.

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, श्री/श्रीमती **१) संजय गंगाधर मुसळे, २) द्रोपती सवंजय मुसळे** यांनी खालील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे घर क्र./प्लॉट/पैकी जागेस नंबर नांव नोंदविण्यास **खरेदीखत** चे आधारे कार्यालयाकडे अर्ज केलेला आहे. घर क्र. २४२/४२७३, वार्ड क्र.२/५, शीट नं.७४ चालता नं., सी.टी.एस.नं. , **सर्व्हे नं.५७** मोहल्ला : शिवाजी नगर टी.पी.एस, जागेची चर्तुसिमा, जागेचे मोजमाप : ८३.६४ चौ.मी.
पुर्वेस : मुकुंद दादाराव बाल्टे यांचे घर
पश्चिमेस : ९ मी सार्वजनिक रस्ता
दक्षिणेस : ज्ञानदेव दगडोबा सुरवसे यांचे घर
उत्तरेस : मारोती शंकर व्हावळे यांचे घरन
सदरी घरास/जागा **मिनाबाई लक्ष्मण जोगदंड** ची नोंद या कार्यालयातील मालमत्तकर नोंदवहित आहे. / यानी विक्री केली आहे. सदरी अर्जप्रमाणे नांव नोंदणी संबंधी कोणास काही आक्षेप हरकत किंवा सुचना करावयाची असेलतर त्यांनी या जाहिरनाम्याचे प्रसिद्ध तारखेपासून १५ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यासह लेखी अर्ज करावा नंतर आलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, परळी वैजनाथ

ना.पंकजाताई मुंडेंचा जिल्ह्यात मॅरेथॉन दौरा; बीडमध्ये दुष्काळी परिस्थितीचा आढावा, हाऊसफुल्ल जनता दरबार तर अंबाजोगाईत हॉस्पीटलचे उद्घाटन

दुष्काळाचा सामना करण्यासाठी प्रशासनाने सतर्क रहावे; चारा, पाणी आणि रोजगारावर लक्ष केंद्रीत करण्याचे दिले निर्देश

बीड/प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा आज जिल्ह्यात मॅरेथॉन दौरा झाला. सकाळी अंबाजोगाईत एका हॉस्पीटलचे उद्घाटन त्यानंतर बीडमध्ये दुष्काळ आढावा बैठक आणि हाऊसफुल्ल जनता दरबार घेऊन जनतेच्या प्रश्नांचा त्यांनी जागेवर निपटारा केला. आढावा बैठकीत त्यांनी चारा, पाणी आणि रोजगारावर लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देश देत सतर्क राहून दुष्काळाचा सामना करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या.

दिवाळी उत्सवाचा पहिला दिवस वसुबारस निमित्त सकाळी गोपीनाथ गडावर जावून ना. पंकजाताई मुंडे यांनी गो धनाची पूजा केली. तत्पूर्वी लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे त्यांनी दर्शन घेतलै. अंबाजोगाई शहरात डॉ नवनाथ घुगे यांच्या घुगे हार्ट अँड क्रिटीकल केअर हॉस्पीटल या सुपर स्पेशालिटी रूग्णालयाचे उदघाटन व अत्याधुनिक सोयी सुविधांचा शुभारंभ ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाला. दुपारी त्यांनी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळ परिस्थिती व पाणी-चारा टंचाई संदर्भात बैठक घेतली. जिलाहाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान तसेच विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

चारा, पाणी रोजगारावर लक्ष केंद्रीत करा

जिल्ह्यातील भूजल पातळीत ४.५५ मीटरने घट झाली असून, १६४ प्रकल्पांमध्ये केवळ १२.०१ टक्के पाणीसाठा उरला आहे. पंकजाताई मुंडे यांनी बैठकीत भूजल पातळी कमी होण्यावर चिंता व्यक्त करत, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पुढील पावसाळ्यापर्यंतचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या आणि प्रलंबित पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्ह्यात सध्या उपलब्ध असलेला चारा केवळ २६ दिवस पुरेल असा अंदाज आहे. वसुबारस आणि गोवर्धन पूजेचा संदर्भ देत, पंकजाताई मुंडे यांनी पशुधनाच्या सद्यस्थितीवर विशेष चिंता व्यक्त केली. माणसांप्रमाणेच मुक्या प्राण्यांनाही पाण्याचा आणि चाऱ्याचा त्रास होत





असल्याचे त्या म्हणाल्या. वन विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि सीएसआर च्या माध्यमातून चारा निर्मितीचे नियोजन करण्यात आले आहे. भविष्यात चारा छावण्यांची गरज भासल्यास त्यात जिओ फेन्सिंग आणि जनावरांच्या टॅगिंगचा वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दुष्काळी परिस्थितीत मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, नाला खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या सर्व उपाययोजनांची योग्य अंमलबजावणी करून प्रशासनाने सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना वेळेवर मदत पोहोचवावी, असे निर्देश पंकजाताई मुंडे यांनी दिले आहेत.

हाऊसफुल्ल जनता दरबार

शहरातील जनसंपर्क कार्यालयात ना. पंकजाताई मुंडेंच आज जनता दरबार हाऊसफुल्ल झाला. बीडसह, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, गेवराई, वडवणी आदी भागांतून आलेल्या जनतेच्या समस्या, गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांचे प्रश्न त्यांनी जागेवरच मार्गी लावले तसेच सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

महिला बचत गटाच्या प्रदर्शनाला भेट

आकांक्षित तालुका कार्यक्रमातंर्गत बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात भरलेल्या आकांक्षा हाट व्होकल फॉर लोकल या महिला बचतगटांच्या विविध वस्तूंच्या प्रदर्शन व विक्री स्टॉलला भेट देऊन त्यांनी पाहणी केली. ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी व सक्षम करणे तसेच त्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या वस्तू, घरगुती दिवाळी फराळ, गृहोपयोगी वस्तू व सुंदर कलाकुसर केलेल्या वस्तू वाखाणण्याजोग्या होत्या. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान याप्रसंगी उपस्थित होते.

बीडमध्ये सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथे स्वेटरच्या भव्य दालनाचे

नगरसेवक शेख बिलाल यांच्या हस्ते थाटात उद्घाटन

बीड/प्रतिनिधी

येथील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्समध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या स्वेटर व उबदार कपड्यांच्या दालनाचा भव्य उद्घाटन सोहळा नगरसेवक शेख बिलाल यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.या उद्घाटनप्रसंगी कामखेडा गावचे सरपंच शेख बिलाल, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मास्टर सिद्दीक सर, परभणी येथील रफिक भाई यांच्यासह परिसरातील प्रतिष्ठित व्यापारी, दुकानदार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या सुरू असलेल्या हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर या दालनात लहान मुले, महिला आणि पुरुषांसाठी दर्जेदार व आकर्षक स्वेटर्सचे विस्तीर्ण कलेक्शन उपलब्ध करण्यात आले आहे. याशिवाय ट्रेंडी जॅकेट्स, आधुनिक ओढण्या आणि उत्कृष्ट कारागिरीच्या अस्सल काश्मिरी शाली ग्राहकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहेत.



एकाच छताखाली हिवाळी कपड्यांचे उत्तम पर्याय उपलब्ध झाल्याने ग्राहकांमधून समाधान व्यक्त होत आहे.याप्रसंगी बोलताना नगरसेवक शेख बिलाल यांनी दुकानदारांच्या नव्या उपक्रमाचे कौतुक केले. ''बीडकरांना एकाच ठिकाणी दर्जेदार आणि किफायतशीर उबदार कपडे खरेदी करण्याची नामी संधी मिळाली आहे; शहरातील नागरिकांनी या दालनाला नक्की भेट द्यावी,असे आवाहन त्यांनी केले. उपस्थित सर्व पाहुण्यांनी दालनाचे अवलोकन करत दुकानदारांना भावी व्यावसायिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

दिवाळीचा पहिला दिवा अनाथ मुलांसोबत

वैजनाथ प्रतिष्ठान पुणे यांच्या तर्फे राबविण्यात आला अनोखा उपक्रम



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

दिवाळीचा पहिला दिवा वैजनाथ प्रतिष्ठान पुणे यांच्यातर्फे राबविण्यात आला अनोखा उपक्रम. परळीतील पुण्यात राहणारा मित्रपरिवार यांच्या तर्फे वैद्यनाथ प्रतिष्ठान पुणे च्या माध्यमातून विकास अनाथ आश्रम चिखली येथे दिवाळी निमित्त फराळ फटाके आकाश कंदील व दिवे वितरण करण्यात आले. यावेळी संकेत वाघमारे, चेतन शिंदे, वैभव फड, राहुल गाढवे, गणेश गित्ते, महेश चौधरी, सर्वेश सरौदे, प्रवीण कांबळे ओमकार गायकवाड, अशोक जाधव, शेख शरीफ, निवृत्ती केंद्रे प्रमोद मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

वानटाकळीच्या सरपंच यांच्याविरोधात

अविश्वास ठराव मंजूर!

तहसीलदार विनोद रनविरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा संपन्न

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वानटाकळी ग्रामपंचायतीच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून, सरपंच गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांच्याविरोधात ग्रामपंचायत सदस्यांनी दाखल केलेला अविश्वास ठराव ८ विरुद्ध ० मतांनी प्रचंड बहुमताने मंजूर झाला आहे. या निर्णयामुळे वानटाकळी गावाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, ग्रामपंचायतीतील सत्तासमीकरणे बदलण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

वानटाकळी ग्रामपंचायतीच्या सात सदस्यांनी सरपंच गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांच्या कारभाराविरोधात तहसीलदार परळी वैजनाथ यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. या अर्जाची दखल घेत तहसीलदार



विनोद रनविरे यांनी गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता ग्रामपंचायत कार्यालय वानटाकळी येथे विशेष सभेचे आयोजन केले होते. तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली (पान ५ वर)

दुष्काळाच्या अंधारात राजेभाऊ फड यांच्याकडून मदतीचा प्रकाश

कन्हेरवाडीत शेतकरी आणि शेतमजुरांना व सर्व ग्रामस्थांना दिवाळी साहित्य किटचे वाटप!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

यंदा पडलेल्या भीषण दुष्काळामुळे बळीराजा आणि ग्रामीण जनता मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहे. एकीकडे हातातोंडाशी आलेला घास दुष्काळामुळे हिरावला गेला असताना, दुसरीकडे आनंदाचा सण असलेली दिवाळी कशी साजरी करावी, असा गंभीर प्रश्न शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य जनतेसमोर उभा



ठाकला आहे. याच बिकट परिस्थितीची जाणीव ठेवून, मा. राजेभाऊ फड, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टी. यांच्या वतीने कन्हेरवाडी येथील सर्व ग्रामस्थांना वैयक्तिक पातळीवर दिवाळी साहित्य किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे कन्हेरवाडीतील शेकडो कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद ओसंडून वाहताना दिसत आहे. (पान ५ वर)

कै.हनुमंतराव मुंडे (बापू) यांच्या स्मरणार्थ तळेगावातील

प्रत्येक कुटुंबाला ५ किलो साखरेचे वाटप

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

दुष्काळाजन्य परिस्थितीत तळेगावातील ग्रामस्थांची दिवाळी गोड व्हावी आणि कठीण काळात गावातील प्रत्येक कुटुंबाला आपुलकीचा आधार मिळावा, या उदात्त भावनेतून कै. हनुमंतराव मुंडे (बापू) यांच्या स्मरणार्थ कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान (नाना) मुंडे व परिवाराच्या वतीने तळेगाव येथील प्रत्येक कुटुंबाला पाच किलो साखरेचे वाटप करण्यात आले.



दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या गावात ऐन दिवाळीत माणुसकीचा गोडवा पसरविणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत (पान ५ वर)





कापसावरील आयात शुल्क केंद्र व राज्य शासनाने शून्य केल्यामुळे व सोया पेंड आयातीमुळे भारतीय शेतकऱ्यांच्या कापसाचे भाव सोयाबीनचे भाव पडणार आहेत सदरील निर्णय शासनाने तात्काळ रद्द करावा याकरिता संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हाधिकारी तहसीलदार यांना क्रांतिकारी शेतकरी संघटनेतर्फे निवेदन देऊन शासन निर्णयाची ठिकठिकाणी होळी करण्यात आली तहसीलदार घनसावंगी यांच्यासमोर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने सदरील जीआर ची होळी करून जाहीर निषेध व्यक्त केला याप्रसंगी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विष्णु शिंदे मराठवाडा युवा अध्यक्ष अशोक हेमके घनसांगी तालुका अध्यक्ष अनिल मोहिते जिल्हा संपर्कप्रमुख दत्ता कोल्हे तालुका संपर्कप्रमुख आप्पासाहेब रणमाळे यांच्यासह तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांनी कापसावरील आयात शुल्क शून्य करण्याच्या शासन निर्णयाची तहसील कार्यालय घनसांगी समोर जाहीर होळी केली.

हादगाव शालेय व्यवस्थापन समीती अध्यक्षपदी शेख तर उपध्यक्षपदी नरवडे यांची एकमताने निवड

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा इंदिरा नगर हादगाव बु.येथील शालेय व्यवस्थापन समीती च्या अध्यक्षपदी अशपाक मुसा शेख तर उपध्यक्षपदी आशोक नरवडे यांची एकमताने निवड करण्यात आली आसुन शिक्षक व पालक वर्गातुन त्याच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

सविस्तर वृत्त आसे कि पाथरी तालुक्यातील हदगाव बु.येथील इंदिरा नगर भागातील जि.प.प्रा.शाळेच्या जुण्या शालेय व्यवस्थापन समीतीचा कार्यकाळ संपन्न झाल्या मुळे नुतन शालेय व्यवस्थापन समीतीची निवड करण्या करिता शाळेचे मु.अ.सागर



उमाप यांच्या अध्यक्षस्तेत दि.०४/११/२०२६ रोजी शाळेत विषेश पालक सभा आयोजीत करण्यात आली होती या पालक सभेच्या बैठकी मध्ये नुतन कार्यकारणीची निवड करण्यात आली या मध्ये शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी अशपाक मुसा (पान ५ वर)



माजी सैनिक संवर्गातून शारीरिक प्रशिक्षक पद भरणार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या मुलांच्या सैनिक सेवापूर्व शिक्षण संस्था (SPI), छत्रपती संभाजीनगर येथे शारीरिक प्रशिक्षक निदेशक (PTI) गट-क संवर्गातील एक रिक्त पद ११ महिन्यांच्या करार पद्धतीने भरण्यात येणार आहे. या पदासाठी माजी सैनिक संवर्गातील पात्र उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास इतर नागरिकांमधील बीपीएड, एमपीएड, साई/एनआयएस प्रशिक्षक पात्रताधारक उमेदवारांचा विचार करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीसाठी सैनिक सेवापूर्व शिक्षण संस्थेत उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे संचालक तथा निवृत्त कर्नल मकरंद देशमुख यांनी केले आहे.



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ७

देहू नगरीतील सर्वात मोठी 'किल्ले बनवा' स्पर्धा! प्रथम क्रमांकाला १०,०००/- रुपयांचे बक्षीस

देहूगांव । प्रतिनिधी
देहू नगरीत यंदा सर्वात मोठ्या 'किल्ले बनवा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे व देहू शहर भारतीय जनता पार्टी यांच्या वतीने ही भव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा नव्या पिढीला मिळावी, मुलांमध्ये इतिहासाबद्दल आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.
स्पर्धेत एकूण ५ बक्षिसे असून, प्रथम क्रमांकाला १०,०००/- रुपयांचे आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहे. त्यासोबतच इतर विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी बनवलेल्या किल्ल्यांचे परीक्षण ७ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे. किल्ल्याची रचना, कल्पकता, स्वच्छता आणि ऐतिहासिक अचूकता या निकषांवर परीक्षण होणार आहे. परीक्षकांचे पथक देहू नगरीत घरोघरी, शाळा, मंडळे आणि सोसायट्यांमध्ये जाऊन किल्ल्यांची पाहणी करणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसाठी विशेष भेट म्हणून २१ नोव्हेंबर रोजी 'रायगड दर्शन' सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याला प्रत्यक्ष भेट देऊन मुलांना इतिहास जवळून अनुभवता येणार आहे.
यावेळी बोलताना युवा मोर्चा अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे म्हणाले, किल्ला बनवणं म्हणजे फक्त मातीची कलाकृती नाही, तर शिवरायांचा इतिहास जपणं आहे. देहूतील प्रत्येक घरातून मुलांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा. विजेत्यांना रायगड दर्शन घडवून आम्ही त्यांचा खरा सन्मान करणार आहोत. देहू नगरीतील सर्व शाळा, मंडळे, सोसायट्या व वैयक्तिक स्पर्धकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन देहू शहर भाजपा व युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या शुभहस्ते पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण व ल क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

रेल्वे फाटकावरील प्रतीक्षा संपणार; नागरिकांचा प्रवास होणार विनाथांबा, वेळ आणि इंधनाची होणार बचत

पिंपरी । बद्रीनारायण घुगे
पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान, सुरक्षित आणि सुरळीत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ल क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभहस्ते आज पार पडले. या दोन्ही विकासकामांमुळे शहरातील पायाभूत सुविधांमध्ये भर पडणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.
महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, माजी महापौर योगेश बहल यांच्यासह महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी,आर.पी.आय.गटनेते कुणाल वाव्हळकर, नगरसदस्य जितेंद्र ननावरे, कुशाग्र कदम, संदीप वाघेरे, डब्बू आसवानी, पंकज भालेकर,विराज लांडे,धर्मपाल तंतरपाळे ,नगरसदस्या संगिता ताम्हाणे, भीमाताई फुगे,मनीषा लांडे, वर्षा जगताप, निकिता कदम, प्रियांका कुदळे, प्रतीक्षा जवळकर,सारिका मासुळकर, अरूणा लंघोटे,अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, माजी नगरसदस्य राजेंद्र जगताप,शाम लांडे,माजी नगरसदस्या सीमा सावळे, सुनिता वाघेरे,सुजाता पालांडे, आशा शेंडगे, उपायुक्त अण्णा बोदडे, अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

रेल्वे फाटकावरील प्रतीक्षा संपणार; वाहतूक कोंडीतून मिळणार दिलासा

पिंपरी डेअरी फार्म येथे उभारण्यात आलेल्या रेल्वे उड्डाणपुलामुळे मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील रेल्वे फाटक (एल सी नं.६०) बंद होणार आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना रेल्वे फाटक बंद असताना थांबून राहण्याची आवश्यकता भासणार नाही. दापोडी-निगडी रस्त्याकडून पिंपरी गावात जाणाऱ्या नागरिकांना आता विनाथांबा प्रवास करता येणार असून, त्यामुळे प्रवासाचा वेळ व श्रम कमी होण्याबरोबरच इंधनाचीही बचत होणार आहे.
पिंपरी, पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील नागरिकांना दापोडी-निगडी रस्त्याला पोहोचण्यासाठी हा मार्ग अधिक सोयीचा आणि जवळचा पर्याय ठरणार आहे. यामुळे परिसरातील अंतर्गत वाहतूक अधिक सुलभ होण्यास मदत होईल. तसेच शगुन चौकमार्गे इंदिरा गांधी पुलावरून दापोडी-निगडी रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांची वर्दळ कमी होण्यास मदत होणार आहे. याशिवाय, पिंपरी, पिंपळे सौदागर आणि रहाटणी येथील नागरिकांना संत तुकाराम नगर



मेट्रो स्टेशनपर्यंत जलदगतीने पोहोचण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. रेल्वे फाटकामुळे निर्माण होणारा विलंब टाळता येणार असल्याने दैनंदिन कामासाठी प्रवास करणारे नागरिक, नोकरदार वर्ग तसेच वाहनचालकांना या पुलाचा मोठा फायदा होणार आहे.

असा साकारला पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपूल..

पिंपरी डेअरी फार्म येथे रेल्वे उड्डाणपूल उभारण्याच्या प्रकल्पासाठी स्वीकृत निविदा रक्कम ६५.२८ कोटी रुपये आहे. या उड्डाणपुलाची एकूण लांबी ५६५ मीटर आणि रुंदी १७.२ मीटर आहे. रेल्वे स्पॅन वगळता व्हायाडक्टची लांबी २४० मीटर असून, त्याची रुंदी १७.२ मीटर आहे. रेल्वे लाईनवरील व्हायाडक्टची लांबी ४५ मीटर आणि रुंदी १९.५ मीटर आहे. या दोन्ही ठिकाणी पादचाऱ्यांच्या सोयीसाठी पदपथाची व्यवस्था करण्यात आली आहे. दापोडी-निगडी रस्त्याकडील पोहोच रस्त्याची लांबी १३५ मीटर, तर रुंदी १७.२ मीटर आहे. पिंपरी बाजूकडील पोहोच रस्त्याची लांबी १४५ मीटर आणि रुंदी १७.२ मीटर आहे.
सेवा रस्त्यांच्या कामामध्ये दापोडी-निगडी रस्त्याकडील पुलाच्या पोहोच रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रेल्वे ट्रॅकपर्यंतच्या सेवा रस्त्याची लांबी २८५ मीटर आणि रुंदी ९.४ मीटर आहे. तसेच पिंपरी बाजूकडील पुलाचा पोहोच रस्ता ते पॉवर हाऊस चौक (विणा सर्कल) पर्यंतच्या रस्त्याची लांबी ७१५ मीटर आणि रुंदी १८ मीटर आहे. या दोन्ही सेवा रस्त्यांवरही पदपथाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनचालकांसोबतच पादचाऱ्यांनाही या मार्गाचा वापर करणे अधिक सोयीचे होणार आहे. या प्रकल्पासाठी संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून एकूण ५.९६ एकर क्षेत्र जुलै २०२२ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले होते. त्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पाची उभारणी करण्यात आली.

क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीमुळे प्रशासकीय कामकाजाला मिळणार नवी सुविधा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ल क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालय हे नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यातील महत्त्वाचे संपर्क केंद्र आहे. परिसरातील नागरिकांना विविध नागरी सुविधा, तक्रारींचे निवारण आणि प्रशासकीय कामकाजासाठी क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयासाठी सुसज्ज आणि सोयीस्कर इमारत उभारण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नूतन इमारतीमुळे प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास तसेच नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.
पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असून, वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीमुक्त, सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास उपलब्ध करून देणे ही महापालिकेची महत्त्वाची प्राथमिकता आहे. पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपूल हा नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील अडथळा दूर करणारा महत्त्वाचा प्रकल्प आहे. या पुलामुळे केवळ दोन भागांमधील अंतर कमी होणार नाही, तर परिसरातील व्यापार, उद्योग आणि दैनंदिन व्यवहारांनाही चालना मिळेल.
– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करताना केवळ सध्याच्या गरजांचा विचार न करता भविष्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि शहराचा विस्तार लक्षात घेऊन पायाभूत सुविधा विकसित करणे आवश्यक आहे. पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपूल हा त्याच दृष्टिकोनातून महत्त्वाचा प्रकल्प आहे. या पुलाची रचना, पोहोच रस्ते आणि सेवा रस्त्यांचे नियोजन करताना वाहनचालकांसह पादचाऱ्यांच्या सुविधांचाही विचार करण्यात आला आहे.तसेच या पुलामुळे शगुन चौक,साई चौक येथील वाहतुक कोंडी तसेच पिंपरी पुलावरील ताण कमी होणार आहे,रेल्वे फाटकामुळे होणारा विलंब टळल्याने वाहनचालकांच्या वेळेची बचत होऊन वाहतुकीचा प्रवाह अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या माध्यमातून शहरात दर्जेदार आणि नागरिककेंद्रित पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.
डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-चिंचवडच्या आशा स्वयंसेविकांसाठी आनंदाची बातमी; दिवाळीनिमित्त मिळणार ७ ते १५ हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहन भत्ता

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकाराने आशा स्वयंसेविकांना मिळाला न्याय

पिंपरी । प्रतिनिधी
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांना दिवाळीनिमित्त मोठा दिलासा मिळाला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता आशा स्वयंसेविकांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याच्या विषयास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे आशा स्वयंसेविकांच्या अनेक दिवसांच्या अपेक्षेला आणि कष्टांना योग्य न्याय मिळाला असल्याची भावना व्यक्त होत आहे.
राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत झोपडपट्टी व झोपडपट्टी सदृश भागासाठी गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार यांना कामावर आधारित मोबदला दिला जातो. महापालिकेत कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांना दिवाळीनिमित्त आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
सदर प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी सप्टेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ हा कालावधी गृहीत धरून भत्ता अदा केला जाणार आहे. या कालावधीत किमान सहा महिने म्हणजेच १८० दिवस कामकाज केलेल्या आशा स्वयंसेविकांना या भत्त्याचा लाभ मिळणार आहे. यासाठी प्रोत्साहन भत्त्याची किमान मर्यादा ७,००० रुपये आणि कमाल मर्यादा १५,००० रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. सदरचा खर्च वैद्यकीय विभागाकडील कुटुंब कल्याण अंतर्गत असणाऱ्या 'बोनस तथा सानुग्रह अनुदान' लेखाशिर्षातून खर्च करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा म्हणून आशा स्वयंसेविका अहोरात्र मेहनत घेतात. तळागाळातील लोकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या निरंतर सेवेचा गौरव व्हावा आणि त्यांना सणाच्या निमित्ताने आर्थिक हातभार लागावा, या उद्देशाने आम्ही या महत्त्वपूर्ण विषयास तात्काळ मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे आपल्या लाडक्या आशा भगिनींना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असून, त्यांची यंदाची दिवाळी अधिक आनंदात जाईल, याचा मला मनस्वी आनंद आहे.
-अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आमदार शंकर जगताप यांचा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात!

३० टन जीवनावश्यक साहित्याच्या माध्यमातून एक हजार शेतकरी कुटुंबांना आधार


पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी
लोकप्रतिनिधित्व म्हणजे केवळ राजकीय जबाबदारी किंवा विकासकामांपुरते मर्यादित नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या सुखदुःखात सहभागी होण्याची सामाजिक बांधिलकी असते. याच जाणिवेतून आणि सेवाभावाच्या संस्कारांतून चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मदतीचा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. बार्शी, भूम-परांडा, कळंब आणि गेवराई परिसरातील एक हजार गरजू शेतकरी कुटुंबांना महिनाभर पुरेल असे जीवनावश्यक साहित्याचे रेशन किट आणि दिवाळीचा फराळ देऊन त्यांच्या घरात सणाचा आनंद पोहोचवण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. या उपक्रमांतर्गत तब्बल ३० टन जीवनावश्यक साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे.
दुष्काळाच्या संकटामुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांसमोर आर्थिक आणि कौटुंबिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत या कुटुंबांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आणि त्यांना दिलासा देण्यासाठी आमदार जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या शहरी भागाचे प्रतिनिधित्व करत असतानाही ग्रामीण



महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी त्यांनी उचललेले हे पाऊल सामाजिक संवेदनशीलतेचे उदाहरण ठरत आहे.
या मदत उपक्रमांतर्गत बार्शी परिसरातील शेलगाव आणि खडकलगाव येथील प्रत्येकी १५० अशा एकूण ३०० कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य देण्यात येणार आहे. भूम-परांडा परिसरातील कासारी येथील १५० आणि सिरसाव येथील पारधी वस्तीतील १०० अशा २५० कुटुंबांना मदतीचा लाभ मिळणार आहे. कळंब परिसरातील गोलेगाव येथील १५० आणि दाभा येथील १०० अशा २५० कुटुंबांना रेशन किटचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच गेवराई तालुक्यातील लोणाळा येथील २०० कुटुंबांनाही या उपक्रमाच्या माध्यमातून मदत पोहोचविण्यात येणार आहे. अशा प्रकारे एकूण सात ठिकाणांवरील एक हजार शेतकरी कुटुंबांना या उपक्रमाचा आधार मिळणार आहे.
राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. राज्य सरकार दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्नशील आहे. शासनाच्या या प्रयत्नांना सामाजिक स्तरावर हातभार लावण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संकटकाळात केवळ शासनावर अवलंबून न राहता समाजातील सक्षम घटकांनीही पुढाकार घेऊन गरजू कुटुंबांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, ही व्यापक भूमिका यामागे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांतून मिळालेला निःस्वार्थ सेवाभाव, राष्ट्र प्रथम आणि समाज प्रथम ही भूमिका तसेच कुटुंबातून मिळालेले सामाजिक बांधिलकीचे संस्कार आमदार जगताप यांच्या सार्वजनिक जीवनाचा महत्वाचा आधार राहिले आहेत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्याच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देणे, हीच खरी समाजसेवा असल्याच्या भावनेतून त्यांनी या उपक्रमाचे नियोजन केले आहे.
विशेष म्हणजे, शहर आणि ग्रामीण भाग यांच्यातील नाते केवळ भौगोलिक किंवा आर्थिक नसून परस्परांच्या सुखदुःखाशी जोडलेले आहे, हा संदेशही या उपक्रमातून देण्यात येत आहे. शहरी भागातील लोकप्रतिनिधीने ग्रामीण भागातील संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी पुढाकार घेणे, हे सामाजिक एकात्मतेचे सकारात्मक उदाहरण आहे. शेतकऱ्यांच्या कष्टांचा सन्मान करत त्यांच्या कठीण काळात मदतीचा हात देणे, ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याची जाणीव या उपक्रमातून अधोरेखित होत आहे. लोकप्रतिनिधींच्या कार्याची खरी ओळख केवळ विकासकामांच्या आकडेवारीतून होत नाही, तर संकटकाळात तो किती संवेदनशीलतेने समाजाच्या पाठीशी उभा राहतो, यातूनही होते. प्रसिद्धीपेक्षा सेवाभाव, अधिकारापेक्षा कर्तव्य आणि राजकारणापेक्षा माणुसकीला प्राधान्य देणारा आमदार शंकर जगताप यांचा हा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण करणारा ठरत आहे.
शेतकऱ्यांच्या संकटात त्यांच्या पाठीशी उभे राहणे हेच आमचे कर्तव्य आहे आपल्या अन्नदात्या शेतकऱ्यांच्या कष्टावर संपूर्ण समाज उभा आहे. मात्र, निसर्गाच्या संकटामुळे त्यांच्याच कुटुंबांवर अडचणींचा डोंगर कोसळतो, तेव्हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आपले नैतिक आणि सामाजिक कर्तव्य आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारांतून आम्हाला समाजसेवेची प्रेरणा मिळाली आहे. समाजाने आपल्याला जे दिले, त्याची परतफेड समाजाच्या सेवेतूनच झाली पाहिजे, ही आमची भावना आहे. या मदतीमुळे एक हजार शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले, त्यांच्या घरातील चिंता थोडी जरी कमी झाली, तरी या प्रयत्नांचे सार्थक होईल. राजकारण, मतदारसंघ आणि भौगोलिक सीमा यांच्यापलीकडे जाऊन माणुसकीचे नाते जपणे, हीच आमची सामाजिक बांधिलकी आहे.
– आमदार शंकर जगताप, चिंचवड विधानसभा मतदारसंघ

पुणे मेट्रो लाइन ३ ला पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद; ५० हजार प्रवाशांनी केला प्रवास

पुणे, पिंपरी । बद्रीनारायण घुगे
माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या महत्त्वाकांक्षी मेट्रो मार्गाला प्रवासी सेवा सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवशी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



बुधवारी (४ नोव्हेंबर) पहिल्याच दिवशी सुमारे ५० हजार प्रवाशांनी या मार्गावरून प्रवास केला. विशेष म्हणजे, दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे शहरातील बहुतांश कार्यालये आणि व्यावसायिक आस्थापने बंद असतानाही मेट्रो प्रवासासाठी नागरिकांनी मोठी पसंती दर्शविली. दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर नियमित कामकाज सुरू झाल्यावर या मेट्रो मार्गाला आणखी मोठ्या संख्येने प्रवासी मिळण्याची अपेक्षा आहे.
या मार्गावर जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानक प्रवाशांच्या सर्वाधिक पसंतीचे ठरले. या स्थानकावरून दिवसभरात सुमारे २५ हजार प्रवाशांनी प्रवास केला. पुणे रेल्वे स्थानकासह शहराच्या विविध भागांना जोडणारे महत्त्वाचे केंद्र असल्याने या स्थानकावर प्रवाशांची सर्वाधिक वर्दळ पाहायला मिळाली.
पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल कुमार सैनी म्हणाले, पहिल्याच दिवशी प्रवाशांकडून मिळालेला प्रतिसाद पाहून आनंद झाला. मेट्रोची कनेक्टिव्हिटी, प्रवासातील आराम आणि कमी वेळेत इच्छितस्थळी पोहोचण्याच्या सुविधेचे नागरिकांनी स्वागत केले आहे. पुणेकरांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू.
दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर पुढील दोन आठवड्यांत कार्यालये आणि व्यावसायिक आस्थापनांचे नियमित कामकाज सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत आणखी वाढ होण्याचा अंदाज आहे. संभाव्य गर्दी लक्षात घेऊन मेट्रोच्या फेऱ्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहे. त्यानुसार गर्दीच्या वेळेत दर पाच मिनिटांनी, तर गर्दी कमी असलेल्या वेळेत दर आठ मिनिटांनी मेट्रो उपलब्ध करून दिली जाणार आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर हा संपूर्ण प्रवास सुमारे ४० मिनिटांत पूर्ण होणार असल्याने विशेषतः आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि नियमित प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.
दरम्यान, नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) सुविधेलाही पहिल्याच दिवशी सकारात्मक प्रतिसाद मिळाला. एकाच कार्डच्या माध्यमातून पुणे मेट्रोच्या सर्व मार्गांवर प्रवास करता येत असल्याने प्रवाशांनी या सुविधेचे स्वागत केले. प्रवाशांच्या मागणीनुसार मेट्रोमधून सायकली नेण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे मेट्रो आणि सायकल या दोन्ही पर्यायांचा वापर करून प्रवाशांना अंतिम टप्प्यातील प्रवास करणे अधिक सोयीचे होणार आहे. सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासोबतच सार्वजनिक वाहतुकीशी पर्यावरणपूरक प्रवासाची जोड देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.
पहिल्याच दिवशी मिळालेला प्रतिसाद पुणे मेट्रो लाइन ३ साठी सकारात्मक सुरुवात ठरली आहे. वाढीव फेऱ्या, विविध प्रवासी सुविधा आणि शहरातील महत्त्वाच्या भागांना जोडणारी कनेक्टिव्हिटी यामुळे आगामी काळात ही मेट्रो पुणेकरांच्या दैनंदिन प्रवासाचा महत्त्वाचा पर्याय ठरण्याची अपेक्षा आहे.

क्षीरसागर विद्यालयात दिवाळीचा आनंदोत्सव; विद्यार्थी व शिक्षकांना मिठाईचे वाटप

चिमुकल्यांच्या कल्पकतेतून साकारले आकाशदिवे

भिगवण । प्रतिनिधी
दिवाळी सणाचे औचित्य साधून क्षीरसागर विद्यालयात विद्यार्थी व शिक्षकांसाठी मिठाई वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमामुळे शाळेमध्ये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि आपुलकीचा सण असून या सणाचा आनंद विद्यार्थ्यांसोबत सामूहिकपणे साजरा व्हावा, या उद्देशाने मिठाई वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना मिठाईचे वाटप करून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.
या कार्यक्रमाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे विद्यालयातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून आणि कलाकौशल्यातून तयार केलेले आकर्षक आकाशदिवे. विद्यार्थ्यांनी विविध रंगांच्या कागदांचा वापर करून सुंदर आकाशदिवे तयार केले होते. त्यांच्या या कलाकृतींमधून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, कल्पकता आणि कलागुण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकाशदिव्यांमुळे शाळेच्या वातावरणात दिवाळीचा प्रकाश अधिकच खुलून दिसत होता.
पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देणे, सण-उत्सवांच्या माध्यमातून आनंद, एकोपा आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजविणे देखील महत्त्वाचे आहे, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंद मिळण्याबरोबरच स्वतःच्या हातांनी काहीतरी निर्माण करण्याची प्रेरणाही मिळते असे संस्थेचे अध्यक्ष अजित क्षीरसागर यांनी सांगितले. मिठाई वाटप आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाशदिव्यांमुळे क्षीरसागर विद्यालयात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या कलाकृतींमधील कल्पकता हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष अजित क्षीरसागर, प्रा. तुषार क्षीरसागर, मा.सरपंच दिपीका क्षीरसागर, रेखा क्षीरसागर, डॉ.उज्वला लोणकर, नवनाथ सावंत, अविनाश नरुटे, सुप्रिया चव्हाण, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



अलंकापुरीत रमा एकादशी दिनी गोवत्स पूजन उत्साहात

माऊली मंदिरात लक्षवेधी संगीत मेजवानी; दिवाळी पहाट प्रारंभ; पुष्प सजावट

आळंदी । प्रतिनिधी
आळंदीतील धार्मिक महत्त्व लक्षात घेत यावर्षी रमा एकादशी दिनी वसुबारस आल्याने गोवत्स पूजन आणि एकादशी विविध धार्मिक उपक्रमांनी परंपरांचे पालन करीत साजरी करण्यात आली. माऊली मंदिरात श्रींचे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्प सजावट करीत वसुबारस देखील साजरी करण्यात आली. यावेळी भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. मंदिरात परंपरांचे पालन करीत दिवाळी पहाट कार्यक्रमातील संगीत मेजवानी हरिनाम गजरात संगीतमय वातावरणात सुरु झाली.
माऊली मंदिरात रमा एकादशी, वसुबारस विविध धार्मिक उपक्रमांनी साजरी झाली. माऊली मंदिरात भाविकांनी दर्शनास गर्दी केली होती. दर्शनास भाविकांनी पहाटे पासून गर्दी करून दर्शन घेतले. मंदिरात लक्षवेधी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. परंपरांचे धार्मिक कार्यक्रम आणि पहाटे दिवाळी पहाट हा संगीत मेजवानी देणारा उपक्रम आळंदी देवस्थानचे वतीने सुरु झाल्याचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. दिवाळी मधील पहिला दिवस संगीत मेजवानी, आणि रात्री इंद्रायणी आरती उत्साहात झाली. हृदयस्पर्शी आवाजात संगीत मेजवानी श्रवणास भाविकांना मिळाली.
वसुबारस हा सण आपल्याला निसर्गाशी जोडून घेण्याचा सण आहे. वसुबारस अंतर्गत गोवत्स पूजन झाले. आळंदी परिसरात दिवाळीस उत्साहात सुरुवात झाली. पहिल्या दिवसी वसूबारस म्हणजे गाई व तीचे वासरू यांची पुजा करण्याचा दिवस होय. गाई ही आपल्याला निसर्गाने दिलेली देणगी आहे. पंच महाभूते यांचा समन्वय करून पर्यावरणाचा समतोल ठेवण्याचे कार्य गाई करते, शेतीसाठी लागणारे सर्व खते, औषधे, मानवास उत्तम आहार गाई देते. यामुळे या गाईंचे महत्व अनन्यसाधारण आहे. हे महत्त्व ओळखून आळंदीतील श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था, आळंदी शहर भाजप तसेच सामाजिक कार्यकर्ते गणेश गरुड, अध्यक्ष मोहन महाराज शिंदे यांचे संकल्पनेतून परिसरात विविध ठिकाणी गोवत्स पूजा उत्साहात करण्यात आली. गाई वाचली तरच निसर्ग वाचणार आहे, निसर्ग वाचला तरच आपण राहणार आहोत, यामुळे आपले जीवन वाचविण्यास व आनंदी जीवनासाठी गाई आपल्यात आवश्यक आहे. यामुळे वसुबारस दिनी गाईची पुजा मोठ्या उत्साहात करण्यात



आली. आळंदी पंचक्रोशीत गाई वाचविण्यासाठी सहकार्य करण्याचा संकल्प करण्यात आला. गाई तुमचे जीवन आनंदाने, समाधानाने भरून टाकील. निसर्ग भरभरून देईल. यासाठी जनजागृती करण्यात आली. श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेत अध्यक्ष मोहन महाराज शिंदे, सचिन महाराज शिंदे यांचे मार्गदर्शनात गोवत्स पूजन उत्साहात झाले.
आळंदी पंचक्रोशीत ठीकठिकाणी गोवत्स पूजनास आवाहन करण्यात आले होते. भारतीय संस्कृतीत गोपूजन महत्त्वाचे मानले जाते. गो मातेच्या कृतज्ञते साठी वसुबारस निमित्त गोवत्स पूजन करण्यात आले. आळंदी शहर आणि पंचक्रोशीत अनेक ठिकाणी गोवत्स पूजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यास परिसरातून मोठा प्रतिसाद मिळाल्याचे संवेदना फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश गरूड यांनी सांगितले. शहरात ठिकठिकाणी गो पूजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिक, महिलांनी तसेच गो पूजकाने या सोयीचा लाभ घेण्याचे आवाहन गरुड यांनी केले होते. आळंदी परिसरातील सार्वजनिक मठ, मंदिरे, चौक परिसरात सामाजिक कार्यकर्ते, गोपालक यांच्या सहकार्याने व्यवस्था करण्यात आली होती. नागरीकांनी येऊन गोवत्स पूजा करण्याचे आवाहन गणेश गरूड यांनी केले होते. या प्रथा परंपरां जोपासण्याचे कार्यात गोभक्त, गोपालक, गोरक्षक यांनी सहभाग घेतल्याचे गणेश गरुड यांनी सांगितले. माऊली गोशाळेचे वतीने गो मातेची मिरवणूक श्री गणेश हुलावळे यांचे मार्गदर्शनात काढण्यात आली. यावेळी परिसरातील गोभक्त पालक, नागरिकांनी गो पूजन उत्साहात केले. गोवत्स पूजनास भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती, स्वच्छता उपक्रम उत्साहात

आळंदी नगरपरिषद, आळंदी देवस्थान, इंद्रायणी आरती सेवा समिती सह विविध सेवाभावी संस्था यांचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर स्वच्छता, इंद्रायणी आरती उत्साहात झाली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ यांचे वाढदिवसा निमित परिसरातील स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. भाजप पुणे शहर सरचिटणीस सांस्कृतिक आघाडी रेश्माताई महाराज वेडे पाटील यांचे संकल्पनेतून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, पदाधिकारी, नागरिक यांनी सहभाग घेतला. यावेळी भागीरथी कुंड स्वच्छ करण्यात आले. या प्रसंगी अरुण घुंडरे, पंकज खैरे, नाझीम शेख, अर्जुन मेदनकर, मंडुबाबा पालवे, बाबासाहेब भंडारे आदीसह नगरपरिषद कर्मचारी, सेवक उपस्थित होते.
इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने नित्य नैमित्तिक एकादशी निमित्त हरिनाम गजरात इंद्रायणीची आरती झाली. यावेळी अनिता शिंदे, सरस्वती भागवत, शोभा कुलकर्णी, सुमनताई सोनवणे, कौसल्या देवरे, ज्योती सटले, वेदिका कदम, केसरबाई कदम, जयश्री भागवत, काशी आडकीने, तारामती गोरे, उषाताई पाटील, इंद्रायणी आरती सेवा समिती संयोजक अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर पाटील, माऊली घुंडरे, बाबुराव मोरे, पिराजी नेवसे महाराज, दिनकर तांबे यांचेसह भाविक, वारकरी उपस्थित होते.
त्रिवेणी भागीरथी कुंड स्वच्छता मोहिमेत आरोग्य विभाग प्रमुख साहेब दराडे, मुकादम पांडुरंग बोरगे, अरुण घुंडरे कामगार नेते, पंकज खैरे, संजोग पाटोळे, जय पारवे, योगेश थोरात, सुनील गालफाडे, शीतल खैरे, उज्वला रंधवे, ज्योती जाधव, शक्ती खिलारे आदींनी सहभाग घेत परिश्रम पूर्वक जलकुंड स्वच्छ केले.

06 Nov 2026 page 2_Layout 1 11/6/2026 12:12 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक
जगमित्र
विशेष संपादकीय

बेभरवशी बाणा !

मतुमच्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाहीफ, ही भावना राजकीय विरोधक, पत्रकार अशा अनेकांनी सरकारबाबत व्यक्त केलेली असेल आणि सरकारनेही त्याकडे आपल्या यशस्वी शैलीनुसार दुर्लक्ष केले असेल. पण देशाचे सर्वोच्च न्यायालयच या शब्दांत केंद्र सरकारला खडसावते तेव्हा त्याची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. ती जशी सरकारने घ्यायला हवी तशीच, विवेक शाबूत असलेल्या नागरिकांनीही घ्यावयास हवी. त्यासाठी हे प्रकरण समजून घ्यायला हवे. आतापर्यंत विद्यमान सरकारला अनेकदा न्यायालयीन शब्दछडीचा प्रसाद मिळाला. मग मुद्दा मबुलडोझर न्यायाफ्चा असेल अथवा मजामीन हा नियम, तुरुंगवास हा अपवादफ हा सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा घालून दिलेला नियम असेल. सरकारने विरोधक वा सव्यसाची पत्रकारांस द्यावी तशी वागणूक न्यायालयासही दिल्याचे अनेक प्रसंग घडले. परंतु न्यायालयाने सरकारला मतुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही,फ अशा शब्दांत खडसावावे इतकी वेळ आली नव्हती. आता तेही झाले. देशाच्या आर्थिक राजधानीत, मुंबईत अर्थमंत्री निर्मला सीतारामन परदेशी गुंतवणूकदारांस आकृष्ट करण्याचे प्रयत्न करत असताना त्याच शहरातील उच्च न्यायालय शहराच्या महापौर आणि सत्ताधार्यांस नि:संदिग्ध शब्दांत ठणकावते आणि तिकडे राजधानी दिल्लीत सर्वोच्च न्यायालय सरकारच्या विश्वासार्हतेची अब्रू चव्हाट्यावर आणते. या दोन घटना सद्य:स्थितीचा आरसा ठरतात. सर्वोच्च न्यायालयातील मुद्दा वेदांत ही भारतीय आणि रव्वा ऑइल ही सिंगापूरमध्ये स्थापन झालेली कंपनी या दोन कंपन्या आणि भारत सरकार यातील मतभेदांचा आहे. तसाच तो त्या मतभेदांवर निघालेल्या न्यायालयीन तोडग्याकडे सरकार कसे दुर्लक्ष करत आले त्याचाही आहे. याचा परिणाम असा की गेली तब्बल २६ वर्षे हे प्रकरण सरकारच्या आडमुठेपणामुळे निकालात निघू शकलेले नाही. ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आले असता न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांनी सरकारला वरील शब्दांत खडसावले. यात भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा प्रश्न असल्याने हे प्रकरण समजून घ्यायला हवे.

झाले असे की केंद्र सरकारने १९९४ सालच्या ऑक्टोबरात कृष्णा-गोदावरी खोर्यातील रव्वा येथे खनिज तेल क्षेत्र विकसित करण्यासाठी वर उल्लेखलेल्या कंपनी समूहाशी करार केला. हा करार तर झाला; पण त्यानुसार हाती लागलेल्या ऊर्जा स्रोतांच्या विक्रीतून नफा झाल्यास तो कसा वितरित करावयाचा याबाबत मतभेद झाले. त्यास सिंगापूर-स्थित कंपनीने मलेशियातील लव-ादासमोर आव्हान दिले. तशी तरतूद मूळ करारात होती आणि गुंतवणूकदार कंपनी सिंगापुरातील असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर दाद मागितली जाणे अनपेक्षित नव्हते. त्यावर २००४ सालच्या ऑक्टोबरात मलेशियन लवादाने अंतरिम निकाल दिला आणि त्यानंतर १२ वर्षांनी २०१६ साली ऑक्टोबरात अंतिम निकाल देऊन हे प्रकरण निकाली काढले गेले. केंद्र सरकारने या वादात सदर सिंगापुरी कंपनीकडून ९.९ कोटी डॉलरची नुकसानभरपाई मागितली होती. ती या लवादाने फेटाळली. त्यास मलेशियाच्या उच्च न्यायालयातही आव्हान दिले गेले. तेही त्या न्यायालयाने फेटाळले. उभयतांनी या कंपन्या भारताच्या मतेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाफ्स काहीही अधिक देणे लागत नाहीत, असा निवाडा दिला. त्यास केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे दिल्ली उच्च न्यायालयानेही केंद्राची मागणी धुडकावून लावली. दिल्ली उच्च न्यायालयात सरकारने भलताच दावा केला. लवादाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची अंतिम मुदत संपुष्टात आल्याचे कारण सरकारने पुढे केले. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. जसमित सिंग यांनी सरकारचा हा दावाही अमान्य केला. दरम्यान, २०१४ साली केंद्राने रव्वा ऑइल कंपनीकडे ६.४० कोटी डॉलर आणि त्यांची भागीदार कंपनी असलेल्या मवेदांतफ्कडे ९.९ कोटी डॉलर्स नुकसानभरपाई मागितली. ती अर्थातच अमान्य झाली. वास्तविक दिल्ली उच्च न्यायालयात फटका खाल्ल्यानंतर तरी केंद्र सरकारने झाले तितके पुरे असे म्हणत प्रकरण सोडून द्यायला हवे होते. पण असे थांबणे केंद्र सरकारला मंजूर नसावे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशास केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशात बदल करण्याची काहीही गरज नाही, असा निवाडा त्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिला आणि तेथे न्या. पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. ममउच्च न्यायालयाच्या निकालात कोणतीही त्रुटी नाही. कायद्यांचा अर्थ लावण्याबाबत तर अजिबातच काही चूक नाहीफ्फ असे अत्यंत स्पष्टपणे नमूद करून न्यायमूर्तीद्वयांनी या कंपन्यांची देणी का तुम्ही लांबवत आहात असे सरकारला विचारले. ममअंमलबजावणीच्या वेळेस तुम्ही निवाडा कसे मानत नाहीफ्फ, हा न्यायालयाचा सरकारला प्रश्न. तो विचारताना युक्तिवाद करून वेळ काय वाया घालवता, असेही सरकारला न्यायालयाने खडसावले. प्रश्न तेथे संपत नाहीत. भारत सरकारकडून आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचा उल्लेख करत न्यायाधीशांनी सरकारच्या धोरणांबाबत प्रश्न उपस्थित केले. ममतुम्ही आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांस आम्ही यंव करू, त्यंव करू असे सांगता आणि प्रत्यक्षात वैकल्पिक लवादाच्या निकालाकडे दुर्लक्ष करताः तुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीफ्फ, इतक्या स्वच्छपणे सरकारची कानउघाडणी केली. आता यानंतर तरी सरकार लवाद आणि न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करते किंवा काय हे दिसेलच. पण जे झाले त्यामुळे सरकारी दफ्तरदिरंगाई आणि आडमुठी नोकरशाही आपल्या विकासाच्या आड कशी येत असते ही बाबही पुन्हा उजेडात येते. सदरहू प्रकरण ३२ वर्षांपासून अनिर्णित आहे. त्यातील पहिल्या लवादाचा निवाडा येऊनही २२ वर्षे सरली. या प्रकरणी लवादाने अंतिम निवाडा दिला त्यासही १० वर्षे उलटून गेली. तरी प्रकरणाचे भिजत घोंगडे तसेच्या तसेच. या पार्श्वभूमीवर मलेशियन लवादाची तत्परता वाखाणण्याजोगी म्हणायची. या लवादासमोर हे प्रकरण २००४ सालच्या ऑगस्ट महिन्यात सादर झाले आणि १२ ऑक्टोबरला तेथे कंत्राटाबद्दलचा अंतरिम निवाडा लागलाही. त्यावरील अपिलावर मलेशियन न्यायालयानेही पाच वर्षांत अंतिम निर्णय दिला. त्यातूनही काही होत नाही असे दिसल्यावर या कंपन्यांनी पुन्हा लवादाचा दरवाजा ठोठावला. त्यासाठी नवीन लवाद स्थापन केला गेला. त्याचा निकाल २०१६ सालच्या ऑक्टोबरात आला. तरीही भारत सरकारने त्याची अंमलबजावणी करणे हे ना ते कारण पुढे करत टाळले.

जलतरणानंतर योगासनातही आभाची सुवर्णभरारी; राज्यात प्रथम क्रमांक, राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यशाची नवनवी शिखरे सर करणाऱ्या बीड जिल्ह्याच्या आभा गणेश मुंडे हिने क्रीडा क्षेत्रात पुन्हा एकदा उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे येथे पार पडलेल्या दुसऱ्या महाराष्ट्र राज्य पॅरा योगासन क्रीडा अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये आभाने अस्थिव्यंग प्रवर्गातून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाची कमाई केली. या यशामुळे तिची राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्यात राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णयश

महाराष्ट्र पॅरा योगासन स्पोर्ट कमिटी आणि महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, बाळ कल्याण संस्था व चिरंजीव फाउंडेशन यांच्या सहकार्याने २ व ३ नोव्हेंबर २०२६ रोजी औंध, पुणे येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आभा गणेश मुंडे हिने आपल्या योगासन कौशल्याचे



उत्कृष्ट प्रदर्शन केले. विविध स्पर्धकांशी चुरशीची लढत देत तिने प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. तिच्या या यशाची अधिकृत प्रमाणपत्राद्वारे नोंद करण्यात आली आहे.

जलतरणातही राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

आभा ही केवळ योगासनातीलच नव्हे, तर पॅरा जलतरणातीलही गुणवंत खेळाडू आहे. पॅरा जलतरण स्पर्धांमध्ये तिने यापूर्वीही अनेक सुवर्णपदके मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. राष्ट्रीय स्तरावरील जलतरण स्पर्धांमध्ये पदकांची कमाई करत तिने बीड जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे, जलतरणासारख्या कौशल्यपूर्ण खेळासोबत योगासन या वेगळ्या क्रीडा प्रकारातही तिने राज्यस्तरीय सुवर्णपदक मिळवले आहे. दोन वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांतील तिची ही कामगिरी तिच्या अष्टपैलू क्रीडागुणांची साक्ष देणारी आहे.

दिव्यांग खेळाडूंसाठी प्रेरणादायी यश

शारीरिक आव्हानांवर मात करत सातत्याने सराव, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर आभा आपले क्रीडा कौशल्य विकसित करत आहे. तिच्या या यशातून दिव्यांगत्व ही प्रगतीतील अडचण नसून इच्छाशक्ती आणि योग्य संधीच्या जोरावर मोठे यश संपादन करता येते, हा प्रेरणादायी संदेश समाजापर्यंत पोहोचत आहे.

नासा-इस्रो शैक्षणिक सहलीसाठी धारूर तालुक्यातील तीन विद्यार्थ्यांची निवड

गटशिक्षणाधिकारी कार्यालयात विद्यार्थी व पालकांचा सत्कार; तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा

धारूर/अतुल शिनगारे

नासा व इस्रो शैक्षणिक सहलीसाठी धारूर तालुक्यातील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. जिल्हास्तरीय अंतिम निवड चाचणीच्या निकालात या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गटशिक्षणाधिकारी कार्यालय, धारूर येथे पालक व शिक्षकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

या निवडीत जिल्हा परिषद हिंगणी येथील इयत्ता सातवीचा विद्यार्थी राजवीर आर. सोळंके याने प्रथम क्रमांक मिळवित नासा व इस्रो शैक्षणिक सहलीसाठी पात्रता मिळविली. जिल्हा परिषद असोला येथील इयत्ता सातवीचा विद्यार्थी कृष्णा एस. भोसले याची इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे. तसेच जिल्हा परिषद अरणवाडी येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी रचना पी. भिसे हिने



कन्या राखीव प्रवर्गातून इस्रो सहलीसाठी पात्रता मिळविली आहे.

शिक्षण विभागामार्फत घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय अंतिम निवड चाचणीचा निकाल जाहीर करण्यात आला असून, त्यानुसार राज्यातील ११ तालुक्यांमधून नासा सहलीसाठी प्रत्येकी एक विद्यार्थी, तर इस्रो सहलीसाठी प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. इस्रो सहलीच्या निवड प्रक्रियेत पहिल्या दोन जागा गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांसाठी, तर तिसरी जागा तालुक्यातील सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनीसाठी राखीव ठेवण्यात आली होती. या निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी कार्यालय येथे गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय कोकणे, ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी शिवाजी अंडील, विस्ताराधिकारी सय्यद हकीम, विनायक गडदे, सह अधिकारी, केंद्रप्रमुख सुदर्शन काळे, क्षीरसागर शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या धारूर तालुक्यातील या तीन विद्यार्थ्यांच्या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षक व पालकांनी मार्गदर्शन केले.

नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी कोणतेही चुकीचे वक्तव्य केले नाही-शेख अमर

बीड/प्रतिनिधी

नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी बीड नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत कोणतेही चुकीचे वक्तव्य केलेले नाही. शहरातील नागरिकांनी संपूर्ण व्हिडिओ पाहिल्यानंतर वस्तु-स्थिती समजून घ्यावी, असे आवाहन काँग्रेनेते माजी नगरसेवक शेख अमर यांनी केले आहे. गेली चाळीस वर्षे बीड नगरपरिषदेची सत्ता एकहाती उपभोगणाऱ्यांना आज लोकशाही पद्धतीने होणारी चर्चा आणि प्रश्न विचारले जाणे नक्कीच खटकणार, अशी टीका शेख अमर यांनी केली. यापूर्वी स्मिता विष्णू वाघमारे, सौ. दुधाळ यांनाही क्षीरसागर कुटुंबीयांनी नगराध्यक्षपदाची संधी दिली होती. त्यावेळी कोणत्या पद्धतीने ठराव घेतले जात होते, हे बीड शहरातील जनतेला चांगलेच माहीत आहे. आजपर्यंत क्षीरसागर कुटुंबीयांच्या माध्यमातून नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्षपदी विराजमान झालेल्यांना स्वतंत्रपणे काम करण्याची कितपत संधी मिळाली, याचाही विचार होणे आवश्यक आहे, सारिकाताई घरामध्ये कशा पद्धतीने वागतात, हा त्यांचा वैयक्तिक विषय आहे. मात्र, नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी सभागृहात कोणतेही चुकीचे वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास करून राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्न करू नये, असेही शेख अमर यांनी स्पष्ट केले.बीड नगरपरिषद ही आता कोणाची खासगी जहागिरी राहिलेली नाही! नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ही शहराच्या विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी असते. ती आदर्श शिक्षण संस्थेची बैठक नाही, याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे. नगरपालिकेचे सभागृह हे शहराच्या जनतेच्या प्रश्नांसाठी आणि विकासासाठी आहे.

जि.प.प्राथमिक शाळा इंदिरानगरच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी शेख, उपाध्यक्षपदी आतार यांची एकमताने निवड



पाथरी/आवडाजी ढवळे

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मराठी) इंदिरा-नगर येथे आज शालेय व्यवस्थापन समितीची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच नवनिर्वाचित सदस्यांची निवड करण्यात आली.

या निवड प्रक्रियेत अध्यक्षपदी तहसीन बेगम शेख सादेक, तर उपाध्यक्षपदी सोहेल मुबारक आतार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक अजयसिंह पाथरीकर, मुख्याध्यापक अशोक कुलकर्णी, महमूद आतार, शेख खालेद, जावेद आतार, आजमुद्दीन तांबोळी, समीर जैदी, रोहिदास गवारे, भागवत कांबळे यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद व समिती सदस्यांनी नवनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यांचे स्वागत करून अभिनंदन केले. यावेळी इंदिरानगर परिसरातील पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आसी माहीती शेख खालेद दादा यांनी दिली.

डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरी वक्तृत्व स्पर्धा संपन्न

पाटोदा/प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित, वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने नवगण शिक्षण संस्थेचे सचिव माननीय डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बीड येथील सौ के एस के महाविद्यालयात आयोजित या स्पर्धेसाठी उद्घाटक म्हणून माजी प्राचार्या आणि ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. दीपाताई क्षीरसागर लाभल्या होत्या. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी अध्यक्षस्थान भूषविले . यावेळी व्यासपीठावर नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे , डॉ. विश्वंभर देशमाने, प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर आणि प्राचार्य डॉ. पंडित खाकरेविराजमान होते, तर वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, डॉ. सोनाजी गायकवाड, पदव्युत्तर विभागाचे संचालक डॉ. गणेश पाचकोरे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल जोगदंड, कार्यालयीन अधीक्षक श्री. चंद्रकांत पवार, पर्यवेक्षक दयानंद सरपते यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि नवगण शिक्षण संस्थेच्या संस्थापिका, स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर आणि स्वर्गीय सोनाजीराव क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर महाविद्यालयाच्या वतीने मा. डॉ. दीपाताई क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आणि स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित असलेल्या परीक्षकांचे स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सोनाजी गायकवाड यांनी प्रास्ताविक करून राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा, विषय, वेळ, मांडणी याविषयी सविस्तर माहिती देऊन, ही स्पर्धा घेण्यामागील भूमिका स्पष्ट केली.

पूर्णा रेल्वे स्थानकावर प्रवाशाला मारहाण; आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

पूर्णा/निशात शेख

पूर्णा रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ परिसरात एका प्रवाशाला मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यापैकी एक आरोपी फरार असल्याची माहिती आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ८ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. पाण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाल्यानंतर काही व्यक्तींनी तक्रारदारासोबत वाद घातला. त्यानंतर लाकडी दांडक्याने तसेच हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीत तक्रारदार जखमी झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी शेख खाजा, शेख अय्यान, सय्यद नूर, शेख रेहान, मोहम्मद इद्रीस, शेख तबरेज आणि एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा सहभाग असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तर अवेस शेख मुजीब हा आठवा आरोपी फरार असल्याची माहिती आहे.

प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरील घटनेने खळबळ; लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप, एक आरोपी फरार

या घटनेप्रकरणी २६ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०.१९ वाजता लोहमार्ग पोलीस ठाण्यात क्रमांक ६८६/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८ (१), ११५(२), १९०, १९१(१) आणि १९१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस कॉन्स्टेबल भिमराव गंगाराम छापेवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. रेल्वे स्थानकासारख्या सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोहमार्ग पोलिसांकडून सुरू आहे.

मरडसगाव शालेय व्यवस्थापन समीती अध्यक्षपदी काळे तर उपध्यक्षपदी भाग्यवंत यांची बहुमतांनी निवड

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी तालुक्यातील मरडसगाव येथील जि.प.प्रा.शाळेच्या शालेय व्यवस्थापन समीती अध्यक्षपदी महेश काळे तर उपध्यक्षपदी सिध्दांत भाग्यवंत यांची बहुमतांनी निवड करण्यात आली आसुन शिक्षक व पालक वर्गातुन त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



सविस्तर वृत्त आसे कि पाथरी तालुक्यातील मरडसगाव येथील जि.प.प्रा.शाळेच्या जुण्या शालेय व्यवस्थापन समीतीचा कार्यकाळ संपन्न झाल्या मुळे नुतन शालेय व्यवस्थापन समीतीची निवड करण्या करिता केंद्र प्रमुख केंद्रे सर,मुख्यध्यापक आरविंद इंगळे, आप्पासाहेब मुळे आदींच्या उपस्थीतीत दि.०४/११/२०२६ रोजी शाळेत विषेश पालक सभा आयोजीत करण्यात आली होती या पालक सभेच्या बैठकी मध्ये नुतन कार्यकारणीची निवड करण्यात आली या मध्ये शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी महेश काळे यांची तर उपध्यक्षपदी सिध्दांत भाग्यवंत यांची बहुमतांनी निवड करण्यात आली. या बरोबर प्रिती लक्ष्मन पाईकराव,कोमल संजय भाग्यवंत,दिपा सुर्यकांत काळे,विष्णु हिंगे,क्रांती संतोष काळे,विष्णु श्रीरंग काळे आदींची शालेय व्यवस्थापन समीती सदस्यपदी निवड करण्यात आली तर शिक्षन तज्ञ म्हणुन गंगाधर शिंदे आदीं सहीत सर्व नुतन कार्यकारणीची बहुमतांनी निवड करण्यात आली आहे. या निवडी बद्दल महेश काळे व सिध्दांत भाग्यवंत यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी साहित्याची पर्वणीच!

दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण आपल्या देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दिवाळीच्या आगमनाने बाज-ारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, मिठाई, फटाके, नवीन कपडे, वाहने आणि विविध इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी होत आहे. आनंदी वातावरणात दिवाळी साजरी होत असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. दिवाळी म्हटले की फटाके, फराळ, आकाशकंदील आणि नवीन कपडे यांची जशी आठवण होते, तसेच दिवाळी आणि दिवाळी अंक हेही एक अतूट समीकरण आहे.

दिवाळी जवळ आली की साहित्यप्रेमी वाचकांना वेध लागतात ते विविध दिवाळी अंकांचे. दिवाळीच्या खरेदीसोबतच पुस्तकांच्या दुकानांकडे वाचकांची पावले वळू लागतात. महाराष्ट्रात दिवाळी अंकांची परंपरा अतिशय समृद्ध आणि जुनी आहे. १९०९ मध्ये मनोरंजन या नियतकालिकाने पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला. तेव्हापासून सुरू झालेली ही साहित्यपरंपरा आजही तितक्याच उत्साहाने सुरू आहे. दरवर्षी महाराष्ट्रात विविध विषयांवरील शेकडो दिवाळी अंक प्रकाशित होतात. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी साहित्याची मेजवानीच! कथा, कविता, कादंबरी, विनोद, व्यंगचित्रे, राजकारण, अर्थकारण, कला, क्रीडा, सामाजिक प्रश्न, शिक्षण, आरोग्य, विज्ञान आणि संस्कृती अशा विविध विषयांचा समृद्ध खजिना दिवाळी अंकांमधून वाचायला मिळतो. नामवंत साहित्यिकांपासून नवोदित लेखकांपर्यंत अनेकांना आपल्या लेखनकौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम दिवाळी अंक करतात. अनेक वृत्तपत्रे, नियतकालिके आणि स्वतंत्र प्रकाशकही दरवर्षी दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित करतात. त्यामुळे दिवाळीच्या फराळासोबतच दिवाळी अंक हा साहित्यप्रेमी कुटुंबांच्या आनंदाचा अविभाज्य भाग बनला आहे. कोरोना महामारीच्या काळात दिवाळी अंकांच्या प्रकाशनावरही मोठे संकट आले होते. छपाई, वितरण आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक प्रकाशकांना अंक प्रकाशित करणे कठीण झाले होते. मात्र, अशा प्रतिकूल परिस्थितीतही काही संपादक आणि प्रकाशकांनी हार न मानता ऑनलाइन माध्यमातून दिवाळी अंक वाचकांपर्यंत पोहोचवले. पीडीएफ स्वरूपातील अंक आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून वाचनाची परंपरा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. आता परिस्थिती पूर्वपदावर आल्याने मुद्रित दिवाळी अंकांनाही पुन्हा चांगले दिवस आले आहेत. त्याचबरोबर डिजिटल आणि ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपातील दिवाळी अंकही वाचकांच्या भेटीला येत आहेत. बदलत्या काळानुसार दिवाळी अंकांनीही आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे, ही समाधानाची बाब आहे.

दिवाळी अंक हे केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत, तर ते आपल्या साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करणारे महत्त्वाचे माध्यम आहे. वाचनसंस्कृती रुजवण्यात आणि ती समृद्ध करण्यात दिवाळी अंकांचे योगदान मोठे आहे. विशेषतः नव्या पिढीला पुस्तकांकडे आकर्षित करण्यासाठी दिवाळी अंकांचा उपयोग होऊ शकतो. आज मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे वाचनाची सवय कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अशा परिस्थितीत मुलांना आणि तरुणांना दर्जेदार दिवाळी अंकांची ओळख करून देणे आवश्यक आहे. यंदाच्या दिवाळीत आपण मित्रपरिवार, नातेवाईक आणि प्रियजनांना मिठाई, फराळ आणि भेटवस्तू देतानाच एखादा दर्जेदार दिवाळी अंकही भेट द्यावा. ही भेट केवळ कागदांची किंवा पुस्तकांची नसून ज्ञानाची, विचारांची आणि साहित्यिक आनंदाची असेल. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा बौद्धिक फराळही प्रत्येक घरात पोहोचला पाहिजे. कारण दिवाळीचा आनंद केवळ दिव्यांच्या प्रकाशात आणि फराळाच्या गोडव्यात नाही, तर ज्ञानाच्या प्रकाशात आणि साहित्याच्या सहवासातही दडलेला आहे. दिवाळी अंकांचे वाचन वाढले, तर वाचनसंस्कृती अधिक समृद्ध होईल आणि मराठी साहित्यविश्वाची परंपराही अधिक बहरत राहील.

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे